रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३४४
www.ramprahar.com
मंगळवार १ जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

भाताण बोगद्यातील अपघातात दुचाकीस्वार ठार/२
'माणगावसह इंदापूर बायपासचे काम तातडीने सुरू करा'/५
बुमराहच्या जागी टीम इंडियात कुणाला मिळणार संधी?/८

## भारतीय रेल्वे प्रवासात आजपासून तीन मोठे बदल

**नवी दिल्ली :** १ जुलैपासून भारतीय रेल्वे काही मोठे बदल लागू करणार आहे. तत्काळ तिकिट बुकिंग



अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने आधार पडताळणी आणि ओटीपीची अनिवार्य आवश्यकता लागू केली आहे. रेल्वे आता प्रवासाच्या आठ तास आधीच चार्ट तयार करण्यास सुरुवात करणार आहे, जेणेकरून सामान्य प्रवाशांना वेळेवर तिकिटे आणि जागा मिळू शकतील. याशिवाय १५ जुलैपासून प्रत्येक बुकिंगसाठी अतिरिक्त आधार ओटीपी पडताळणी प्रक्रिया सुरू होईल. एसी कोचसाठी वेटिंग लिस्ट तिकिटांची मर्यादा २५%वरून ६०%पर्यंत वाढवण्यात आली आहे. रेल्वे १ जुलैपासून प्रवासी भाड्यात किरकोळ वाढ करणार आहे. मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांसाठी, नॉन-एसी गाड्यांचे भाडे प्रति किलोमीटर १ पैशाने वाढेल, तर एसी वर्गातील भाडे प्रति किलोमीटर २ पैशाने वाढेल.

# महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे हित पाहणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात त्रिभाषा सूत्र स्वीकारायचे की नाही यावर आम्ही एक समिती नेमली आहे. ती समिती आता ठरवेल. आम्ही कुठल्याही पक्षाचे हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे हित पाहणार. कुणाच्याही दबावाखाली झुकणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्यासंबंधी काढण्यात आलेले दोन जीआर राज्य शासनाने रद्द ठरवले. यानंतर सोमवारी (दि. ३०) पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत विचारलेल्या प्रश्नांना

**मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती**



उत्तरे देताना टोलेबाजी केली तसेच मराठी भाषा आणि हिंदी सक्तीवरून विरोधकांकडून सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांचा समाचार घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या विश्वासू नेत्याने पहिली ते बारावी हिंदी सक्तीची करा, अशी शिफारस केली होती. तो अहवाल उद्धव ठाकरेंनी स्वीकारला आणि नेहमीप्रमाणे घुमजाव केले, पण आम्हीही कुठलाही अहंकार न बाळगता निर्णय घेतला. मी पुन्हा सांगतो आम्ही निर्णय केला आहे. आता समिती स्थापन केली आहे. समिती ठरवेल. आम्ही कुठल्याही पक्षाचे हित बघणार नाही. आम्ही विद्यार्थ्यांचे हित बघू. विद्यार्थ्यांच्या हिताचे जे असेल, तोच निर्णय महाराष्ट्र सरकार घेईल. कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही.

ठाकरे बंधूंनी एकत्र येऊ नये म्हणून मी जीआर काढला नाही. दोन भाऊ एकत्र येत असतील, तर मला अतिशय आनंद आहे. त्यांनी जरूर एकत्रित यावे. तुमच्या काळामध्ये पहिली ते बारावी हिंदी सक्तीचा निर्णय का घेण्यात आला, असा प्रश्न राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना विचारावा. बाकी त्यांनी एकत्र यावे, खेळावे, जेवण करावे, काहीही करावे आम्हाला काहीही फरक पडत नाही, हे सगळे दुटप्पी लोक आहेत. यांचे सत्तेतले रूप वेगळे असते, विरोधातले वेगळे असते, खासगीतले आणखी वेगळे असते, असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला.





## भाजप प्रदेशाध्यक्षपदासाठी रवींद्र चव्हाण यांचा अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आणि माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि. ३०) भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदासाठी नामांकन अर्ज केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्याकडे सुपूर्द केला. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मंत्री, खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, भाजप नेते रवींद्र चव्हाण यांची पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड निश्चित मानली जाते आहे. मंगळवारी या संदर्भातील अधिकृत घोषणा केली जाईल. आम्ही सगळ्यांनी त्यांच्या नावाला पाठिंबा दिला आणि त्यांचा अर्ज पक्षश्रेष्ठींकडे सोपवला आहे, अशी माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रवींद्र चव्हाण यांच्याबद्दल कौतुकोद्गार काढले. कोकणात आमचा विस्तार अतिशय चांगल्या पद्धतीने झालेला आहे. या विस्तारात रवींद्र चव्हाण यांचा विशेष मोलाचा वाटा आहे. त्यांचे काम केवळ कोकणापुरते मर्यादित नाही, संपूर्ण महाराष्ट्रात आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी सांगितले की, राष्ट्र प्रथम्, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः हा भाजप परिवाराचा मूलमंत्र अनुसरून अंत्योदयाच्या मार्गावर आजवर वाटचाल करत आलो. या वाटचालीत पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोलाची साथ आणि जनतेचे आशीर्वाद लाभले. या पाठबळावर यापुढच्या वाटचालीतदेखील तुम्हा सर्वांचे आशीर्वाद मोलाचे ठरणार आहेत.

## आजपासून एसटी बसच्या आगाऊ आरक्षणात १५ टक्के सवलत

**मुंबई : प्रतिनिधी**

एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या (१५० किमीपेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पूर्ण तिकीटधारक (सवलतधारक प्रवासी वगळून) प्रवाशांना दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी व उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात १ जुलैपासून करण्यात येत आहे.

१ जूनला एसटीच्या ७७व्या वर्धापन दिनी परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास



त्यांच्या तिकिटांमध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे. अर्थात, ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

आषाढी एकादशीला व गणपती उत्सवासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. राज्यभरातून पंढरपूर येथे जाणाऱ्या नियमित बसेसचे आरक्षण प्रवाशांनी केल्यास त्यांना त्यांच्या तिकीट दरात १५ टक्के सवलत १ जुलै रोजी लागू होत आहे. तथापि जादा बसेससाठी ही सवलत लागू असणार नाही. मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या प्रतिष्ठित ई-शिवनेरी बसमधील पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल.

आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, public.msrtcors.com या एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा msrtc Bus Reservation या मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५ टक्के सवलत प्राप्त करता येऊ शकते.

## इलेक्ट्रिक ट्रॅक्टरला मिळणार सबसिडी

**मुंबई :** राज्यात इलेक्ट्रिक ट्रॅक्टरच्या विक्रीला चालना मिळावी म्हणून राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या कामासाठी जर इलेक्ट्रिक ट्रॅक्टरची खरेदी केली, तर त्यांना दीड लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या खर्चात कपात व्हावी आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

राज्यातील इंधनाच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडेनाशी झाली आहे. वाढत्या डिझेलच्या खर्चामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही मोठी वाढ होत आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टरवर अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे अनुदान दीड लाख रुपये इतके आहे. यासोबतच राज्य सरकारच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना व्याजमुक्त कर्जदेखील दिले जाईल. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## काँग्रेस नेते कुणाल पाटील यांचा आज भाजपप्रवेश



**धुळे :** काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा माजी आमदार कुणाल पाटील यांची भाजप प्रवेशाची तयारी पूर्ण झाली असून मंगळवारी (दि. १) त्यांचा भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. जिल्ह्यातील काँग्रेसचा एक मजबूत स्तंभ यानिमित्ताने ढासळणार आहे.

माजी मंत्री रोहिदास पाटील हे काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांचे वडील, तर आजोबा स्वातंत्र्यसैनिक माजी खासदार चुडामण आनंदा पाटील यांचाही राजकारणात दबदबा होता. २०१४ आणि २०१९मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत धुळे ग्रामीणमधून कुणाल पाटील हे विजयी झाले. भाजपच्या वाढत्या प्रभावामुळे आता त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाध्यक्षाविना राहिलेल्या काँग्रेसमधून पाटील हे बाहेर पडल्यावर जिल्ह्यात भाजपची ताकद अधिकच वाढणार आहे.

## निवडक

### तेलंगणात फॅक्ट्रीमध्ये स्फोट; १२ जणांचा होरपळून मृत्यू

**हैदराबाद :** तेलंगणामध्ये संगारेड्डी येथील सिगाच्या नावाच्या गोळ्या-औषधे तयार करणाऱ्या सोमवारी (दि. ३०) फॅक्ट्रीमध्ये भीषण स्फोट झाला व आग लागली. यामध्ये १२ जणांचा होरपळून मृत्यू, तर ३४पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी काहींची प्रकृती गंभीर आहे. घटनास्थळी बचाव आणि मदतकार्य सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### जीएसटी संकलनामध्ये पाच वर्षांत दुप्पट वाढ

**नवी दिल्ली :** जीएसटी संकलनात केंद्र सरकारने स्वतःचाच रेकॉर्ड तोडत विक्रमी संग्रह नोंदवला आहे. गेल्या चार वर्षाआधी २०२०-२१मध्ये ११.३७ लाख कोटी रुपये इतका जीएसटी सरकारी खात्यात जमा झाला होता. आता या वित्तीय वर्षांमध्ये २०२४-२५मध्ये तब्बल २२.०८ लाख कोटी रुपये सरकारी खात्यात जमा झाले आहे. विशेष बाब म्हणजे हा जीएसटी गेल्या पाच वर्षात दुप्पट झाला आहे.

## रायगडातील धरणक्षेत्रात पाणीसाठा वाढला

**रोहा : प्रतिनिधी**

जून महिन्यात समाधानकारक पाऊस पडल्याने रायगड जिल्ह्यातील धरणक्षेत्रात पाणीसाठा वाढला आहे.



जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाच्या अखत्यारित असलेल्या २८ धरण क्षेत्रात सरासरी ८३.१९ एवढा पाणीसाठा उपलब्ध झाला आहे. हा पाणीसाठा गेल्या वर्षापेक्षा जास्त आहे.

जून महिन्याच्या अखेरीस १७ धरण क्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तीन धरण क्षेत्रात ७५ टक्क्यांच्या वर पाणीसाठा असून ही धरणे लवकरच १०० टक्के भरण्याच्या मार्गावर आहेत. चार धरणक्षेत्रात ५० ते ७५ टक्क्यांदरम्यान पाणीसाठा उपलब्ध आहे, तर ५० टक्क्यांपेक्षा खाली चार धरण क्षेत्रात पाणीसाठा आहे.

फणसाड (ता. मुरूड), वावा (ता. तळा), सुतारवाडी (ता. रोहा), आंबेघर (ता. पेण), कोंडगाव व घोटवडे, कवेळे, उन्हेरे (ता. सुधागड), पाभरे, संदेरी (ता. म्हसळा), वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे (ता. महाड), भिलवले, कलोते मोकाशी, डोणवत (ता. खालापूर) या धरणांच्या क्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. या खालोखाल उसरण (ता. पनवेल) तालुक्यातील ८६ टक्के, कुडकी (ता. श्रीवर्धन) ८५ टक्के, बामणोली (ता. पनवेल) ७५ टक्के, अवसरे (ता. कर्जत) ७१ टक्के, मोरबे (ता. पनवेल) आणि पुनाडे (ता. उरण) धरणक्षेत्रात ५४ टक्के पाणीसाठा आहे. उर्वरित कार्ले (ता. श्रीवर्धन) ६४ टक्के, ढोकशेत (ता. सुधागड) ४९ टक्के, साळोख (ता. कर्जत) धरणक्षेत्रात ४३ टक्के, श्रीगाव (ता. अलिबाग) ३१ आणि रानीवली (ता. सुधागड) धरणक्षेत्रात १७ टक्के पाणीसाठा आहे.

## उत्तम अभिनयासाठी प्रशिक्षण शिबिर महत्त्वाचे

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराच्या उद्घाटन समारंभात बोलताना नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी उत्तम अभिनयासाठी प्रशिक्षण शिबिर महत्त्वाचे असते, असे प्रतिपादन केले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या शिबिराच्या उद्घाटन समारंभाला भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, नेत्रा पाटील, युवा अध्यक्ष नितेश पाटील, संध्या शारबिद्रे, पनवेल महापालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.





राजू पाटोदकर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, स्मिता गांधी, समीर कदम, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, अमोल खेर तसेच प्रशिक्षक प्रा. रवि धुतडमल, संकेत खेडकर आणि रंगकर्मी उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले की, रोजच्या आयुष्यात आपणा सर्वांना अभिनय करावा लागतो, परंतु उत्तम अभिनय करण्यासाठी आवाजातील चढ-उतार, शैली, कौशल्याची गरज असते. त्यासाठी या अशा अभिनय शिबिराची गरज आहे. नेहमीच्या रूटीन उपक्रमांपेक्षा मनपाच्या वतीने होत असलेला हा उपक्रम निश्चितच आगळावेगळा असून तो अभिनंदनीय असा आहे. खारघरकरांसाठी या परिसरात एका नाट्यगृहाची आवश्यकता असून लवकरच ती पूर्ण केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

ब्रिजेश ठाकूर यांनीही शिबिरासाठी शुभेच्छा देत अभिनय प्रशिक्षण हा उपक्रम खारघरमध्ये घेतल्याबद्दल मनपाचे व नाट्य परिषदेचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. राजू पाटोदकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्यामनाथ पुंडे यांनी मानले.

नाटक चालवताना अभिनयासाठी आवश्यक गुणांचा विकास होण्यासाठी प्रशिक्षण मिळावे याकरिता महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी पुढाकार घेऊन मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. **(पान २ वर..)**



खारघर : महाराष्ट्र ओरिया वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने आणि श्री जगन्नाथ मंदिराच्या माध्यमातून खारघरमध्ये २७ जून ते ५ जुलैदरम्यान भव्य रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, प्रितम महापात्रा, बिघ्नराज परिदा, मनोज नायक, दीपक शाहू, शैलेंद्र त्रिपाठी, गायत्री महापात्रा आदी उपस्थित होते.

## पनवेल मनपाची कर्मचारी शुभांगीची भरारी

### जागतिक पोलीस व अग्निशमन स्पर्धेत कांस्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील डॅशिंग महिला कर्मचारी शुभांगी संतोष घुले यांनी अमेरिकेतील अल्बामा येथे झालेल्या २१व्या जागतिक पोलीस व अग्निशमन स्पर्धेत कांस्यपदक प्राप्त केले आहे.

या प्रतिष्ठित अल्टीमेट फायर फायटिंग चॅलेंज स्पर्धेत जगातील उत्कृष्ट ५० संघ सहभागी झाले होते. स्पर्धा अग्निशमन, पोलीस दल आणि बचाव कार्यातील व्यावसायिक कौशल्यांची चाचणी घेणारी होती. अग्निशामक शुभांगी यांनी इतर देशांच्या स्पर्धकांशी सामना करत यश मिळवून स्वतःसह पनवेल महापालिकेचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल केले.

याआधी एप्रिल महिन्यात नवी दिल्ली येथे झालेल्या थर्ड इडिएशन ऑफ ऑल इंडिया फायर सर्व्हिसेस स्पोर्ट्स ॲण्ड फायर सर्व्हिसेस मीट २०२५मध्ये शुभांगी यांनी थाळीफेक व गोळाफेक या दोन खेळांमध्ये सुवर्णपदक पटकाविले होते.

जागतिक पातळीवरील यशाबद्दल पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांनी शुभांगी यांचे अभिनंदन केले.



**ही स्पर्धा माझ्यासाठी एक महत्त्वाचा अनुभव होती. मला माझ्या प्रशिक्षकांचा, कुटुंबियांचा आणि पनवेल महापालिकेचा पाठिंबा नेहमीच प्रेरणादायी राहिला आहे. यापुढेही मी अधिक मेहनत करून भारताचे नाव उच्च ठरवण्याचे काम करेन.**

**-शुभांगी घुले**


# इलेक्ट्रिक ट्रॅक्टर खरेदीसाठी दीड लाख रुपयांचे अनुदान

## शेतकऱ्याचा खर्च ७० टक्के कमी होणार

**मुंबइ : रामप्रहर वृत्त**

राज्यात इलेक्ट्रिक ट्रॅक्टरच्या विक्रीला चालना मिळावी म्हणून राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या कामासाठी जर इलेक्ट्रिक ट्रॅक्टरची खरेदी केली तर त्यांना दीड लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या खर्चात कपात व्हावी आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी हा निर्णय घेतला आहे.

राज्यातील इंधनाच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडेनाशी झाली आहे. वाढत्या डिझेलच्या खर्चामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही मोठी वाढ होत आहे, पण तुलनेने उत्पन्न मात्र तेवढं मिळत नाही.



त्यामुळेच शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टरवर अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे अनुदान दीड लाख रुपये इतके आहे.

**सरकारची ही नवीन योजना काय आहे?**

डिझेलचे दर वाढत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची मशागत महागात पडत आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक ट्रॅक्टर वापरण्याचे आवाहन केले आहे. त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना दीड लाख रुपयांची सबसिडी देखील देणार आहे. इलेक्ट्रिक ट्रॅक्टरने शेतीमध्ये नवीन क्रांती होईल. शेतकऱ्यांनी जर इलेक्ट्रिक ट्रॅक्टर खरेदी केले तर त्यांना राज्य सरकार दीड लाख रूपयांची सबसिडी देखील देणार आहे. राज्य सरकारच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना व्याजमुक्त कर्जदेखील दिले जाईल, असेही सांगितले

**खर्च कमी आणि उत्पादनात होणार वाढ**

डिझेलऐवजी इलेक्ट्रिक ट्रॅक्टरचा वापर केल्याने ऑपरेटिंग खर्च ६० ते ७० टक्क्यांपर्यंत कमी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सध्या राज्यातील अनेक भागात नांगरणीसाठी १५००–२००० रूपये प्रति एकर खर्च येतो, पण इलेक्ट्रिक ट्रॅंक्टरने हा खर्च कमी होऊ शकतो आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते.

# नेरळ पाडा रेल्वे गेट तांत्रिक बिघडामुळे बंद; प्रवाशांचे हाल

■ रुग्णाला घेऊन जाणारी रुग्णवाहिका अर्धा तास अडकली





**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ पाडा गेट येथील वाहतूक कोंडी ही दिवसेंदिवस डोके दुखी ठरत असताना आज चक्क येथील स्वयंचलित गेट तांत्रिक अडचण आल्याने काही काळ बंद पडून राहिले होते.यामुळे येथे चांगलीच वाहतूक कोंडी झाली होती.शिवाय या वाहतूक कोंडीचा फटका येथील रुग्णाला घेऊन धावणाऱ्या रुग्णवाहिकेला देखील भोगावा लागला.तब्बल अर्धातास ही रुग्णवाहिका या वाहतूक कोंडीत अडकून पडली.

मध्य रेल्वेच्या नेरळ कळंब या राज्य मार्गावरील नेरळ पाडा रेल्वे गेट हा वाहतुकीसाठी अडचण ठरत आहे.पर्यायी रस्त्याची दुरवस्था झाल्याने एकमेव मार्ग म्हणून नेरळ पाडा गेट हा एकाच पर्याय नागरिकांकडे आहे. मात्र येथील अरुंद रस्ता,आणि येणारी रेल्वे ट्रेन यामुळे हा गेट सतत बंद करावा लागत असल्याने वाहतूक कोंडी होते.त्यातच आज येथील स्वयंचलित असलेल्या लोखंडी गेट मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने बंद पडले . येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती.अगोदरच येथील समस्याने बेजार झाल्याने नागरिकांना अधिकच आज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला त्यातच येथे रुग्णाला घेऊन धावणारी रुग्णवाहिका ही अडकून पडली.

गेली अनेक वर्षे येथे उड्डाण पुलाची मागणी होत असून पर्यायी पेशवाई मार्गाची दुरुस्ती करावी म्हणून मागणी होत असताना देखील लोक प्रतिनिधी लक्ष देत नसल्याने आज येथे रुग्णाला घेऊन जाणाऱ्या वाहन चालकाला मोठा संघर्ष करावा लागला.त्यामुळे ही समस्या सुटणार कधी असा प्रश्न आहे.



# मुरूडमध्ये विजेच्या गोंधळामुळे काजू उत्पादकांचे नुकसान

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यात वारंवार वीज गायब होत असल्याने याचा सर्व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.सातत्याने वीज गायब झाल्याने थंड पेय विक्रेते व दूध विक्रेते त्याच प्रमाणे काजू उत्पादकावर मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

महावितरण यांच्या कडून मजगाव नांदगाव परिसरात दिवसातून पाच ते सहा वेळा चार ते पाच तासासाठी लाईट जात आहे यामुळे काजू उद्योग व्यवसायात दररोज दोन ते तीन हजाराचा तोटा सहन करावा लागत आहे. महावितरणचे अधिकारी यांच्याकडे संपर्क साधला असता डायरेक्ट लाईन गेली आहे असे उत्तर देतात .नांदगाव केंद्रात २६ उपगावे असून सुमारे २५ हजार जनतेला विजेच्या अनिमितेला सामोरे जावे लागत आहे.

मजगाव येथे प्रीतम पाटील यांचा काजू गर उत्पादनाचा व्यवसाय आहे. हजारो टन काजू बियांवर वेग वेगळ्या प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वीज खूप आवश्यक आहे.जर वीज नसेल तर सर्व कामे ठप्प पडतात.या बाबत अधिक माहिती सांगता प्रीतम पाटील यांनी सांगितले की,माझ्या काजू व्यवसायात १३ कामगार असून लाईट गेल्यामुळे कोणतेही काम होत नाही व कामगारांना रोजचा पगार द्यावा लागतो वीज वितरण विभागाच्या भोंगळ कारभारामुळे लाखो रुपयांचा नुकसान होत आहे. नांदगाव येथील वीज वाहिनी बदलण्याकरिता नांदगाव येथील डीपी न बंद करता माजगाव नांदगाव संपूर्ण परिसरातील लाईट परमिट घेऊन बंद करतात, बिल थकलं तर लगेच लाईट बंद करायला धावतात परंतु वीज ग्राहकांचा नुकसान होत आहे याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. वीजपुरवठ्यामध्ये सुधारणा केली नाही तर याबाबत ग्राहक मंचाकडे दाद मागण्याचा विचार करीत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

**सध्या पावसाळी दिवसात जोरदार वारा वाहिल्याने झाडाच्या फांद्या मुख्य वाहिनीवर पडत असतात. अशावेळी वीज प्रवाह सुरळीत होण्यासाठी मुख्य वाहिनी बंद करावी लागत आहे. याशिवाय पाब्रे सब स्टेशनवरून वीज काही कामासाठी घालवत असतात त्यामुळे वीज खंडित होत असते.**
**–श्री. शेख,**
**महावितरण अभियंता, नांदगाव**

# चौल भोवाळे घुमट परिसरात वृक्ष लागवड आणि संवर्धन उपक्रम



**रेवदंडा: प्रतिनिधी**

चौल भोवाळे येथील घुमट बगिचा परिसरात वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रम मोहिमेचा प्रारंभ वृक्षारोपण कार्यक्रमाने संपन्न झाला. चौल येथील निसर्ग प्रेमी संस्था, ओएसिस;बहुउद्देशीय समाजभिमुख संस्था, रेवदंडा, चौल कृषक कल्याणकारी संस्था, भोवाळे ग्रामस्थ व भगवती ग्रुप यांचे सयुक्त विदयमाने वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रम मोहिम राबविण्यात आली. या स्तुत्य उपक्रमास अलिबाग वनविभागाचे विशेष सहकार्य लाभले.

अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्या संस्मरणीय निसर्ग कार्याला समर्पित वृक्षारोपण तथा वृक्ष संवर्धन उपक्रम २०२५ च्या अनुषंगाने अलिबाग वनविभागाने माझे वन माझी जबाबदारी राबविताना स्थानिक वनअधिकारी मौलेश तायडे, उदय हटवार, व प्रभाकर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार दि.२९ जुनरोजी चौल भोवाळे घुमट बगिचा परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमास सुरूवात केली.

या उपक्रमात करंज,चिंच, काजू, बदाम आदी एकूण ५०० वृक्ष रोपटयाची लागवड करण्यात आली, तत्पुर्वी अरण्यऋषी मारूती चित्तमपल्ली यांना स्मरण करून स्वरा काटे या लहान मुलींच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. या उपक्रमासाठी वनविभागाचे अधिकारी मौलेश तावडे, उदय हटवार, प्रभाकर भोईर, वनकर्मचारीसह ओएसिसचे संस्थापक प्रतिक कोळी व सहकारी, निसर्ग ग्रुप चौल राकेश काटे व ग्रुप सदस्य, चौल कृषक कल्याणकारी संस्थेचे सदस्य, भगवती ग्रुप सदस्य स्थानिक भोवाळे ग्रामस्थ यांनी सहभाग घेवून श्रमदानातून विविध वृक्ष रोपटयांची लागवड करून वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी राबविला.

## कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या अध्यक्षपदी संतोष पेरणे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका आगरी समाज संघटना या धर्मादाय संस्थेच्या अध्यक्ष पदी पत्रकार संतोष पेरणे यांची बिनविरोध निवड झाली. संस्थेच्या अध्यक्ष पदासाठी १६ कार्यकर्ते इच्छुक होते मात्र संस्थेचे माजी अध्यक्ष आणि जेष्ठ सदस्य यांनी पुढाकार घेऊन संतोष पेरणे यांना संधी देण्याचा निर्णय घेतला,तर भगवान धुळे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

कर्जत तालुक्यातील आगरी समाज संघटनेची सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा नेरळ जवळील बोपेले येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात झाली. यावेळी संतोष पेरणे यांच्या नावाची अध्यक्ष म्हणून घोषणा केली. त्यांचे समाजात असलेले वर्चस्व तसेच त्यांना शासकीय कामाचा दांडगा अनुभव तसेच तळागाळातील जनतेशी त्यांची जोडलेली नाळ, समाजासाठी त्यांनी केलेले यापूर्वीचे काम पाहता पेरणे हे नाव सुरुवातीपासून आघाडीवर राहिले होते.




# महाकवी कालिदास दिनानिमित्त विशेष कार्यक्रम पाऊस माझा तुझा

**नवी मुंबई : बातमीदार**

महाकवी कालिदास दिनानिमित्त 'पाऊस माझा तुझा ' कविता सादरीकरणाचा कार्यक्रम योग विद्यानिकेतन वाशी येथे संपन्न झाला. अखिल भारतीय साहित्य परिषद, नवी मुंबई साहित्य परिषद आणि योग विद्या ननिकेतनने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री लेखिका रेश्मा कारखानीस उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष पद साहित्यिक पत्रकार दुर्गेशजी सोनार यांनी भूषविले .डॉ. नंदकिशोर जोशी ,डॉ.अरुंधती जोशी यांच्या मार्गदर्शनातून हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

श्रीहरी पवळे यांनी पाऊस माझा तुझा संकल्पनेचा प्रवास थोडक्यात सांगितला. दिलीप जांभळे ह्यांनी महाकवी कालिदासांची माहिती सांगितली. शब्दसंवाद मी अंकुर पर्यावरण अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पाऊस माझा तुझा कविता सादरीकरणासाठी जवळ जवळ ५० /६० कविता आल्या होत्या. त्यापैकी १५ जणांना कविता सादरीकरणाची संधी दिली व इतर सर्व कविता ईबुक अंकात घेणार आहेत.



रेश्मा कारखानीस ह्यांनी बालकविता ,पाऊस निसर्ग लावणी अतिशय सुंदर रित्या सादर केली, कविता लेखन कसे करावे , मनापासून कविता लिहिली गेली पाहिजे. आतून उत्स्फूर्त अशी ती प्रसवली पाहिजे साध्या सोप्या भाषेत यांनी साहित्य श्रोत्यांशी संवाद साधला. त्याचप्रमाणे दुर्गेशजी सोनार यांनीही कवितेचे विविध प्रकार सहज आपल्या सुंदर अशा शैलीतून प्रेक्षकांसमोर मांडले. त्यांचे.तानसेन होण्यापेक्षा कानसेन होणे महत्त्वाचं आहे, कवितांचे प्रकार ,त्याची माहिती काही विशेष अशा कविता पंढरीची वारी कविता त्यांनी सादर केली .फक्त मुक्तछंद लिहीत असतानाही त्यातीलही छंद जोपासला गेला पाहिजे हे विशेष करून त्यांनी नोंदवले

**पान १ वरुन**

## उत्तम अभिनयासाठी प्रशिक्षण शिबिर महत्त्वाचे


अभिनय प्रशिक्षण शिबिराला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादामुळे सकाळी ९ ते १२, दुपारी १ ते ४ आणि सायंकाळी ५ ते ८ अशा तीन सत्रात शिबिर होणार आहे. त्याचप्रमाणे दोन गटात ते घेण्यात येत आहे. यामध्ये पहिला गट वय ८ ते १६ आणि दुसरा गट १६ ते ६० वयापर्यंत आहे. आठ दिवस हे शिबिर चालणार आहे.

या शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून नाट्य कलावंत दिग्दर्शक अशोक केंद्रे (मुंबई), मूक अभिनय अभ्यासक संकेत खेडकर (अहिल्यानगर), प्रा. रवी धुताडमल (रिपर्टरी थिएटर–एनएसडी) प्रा. डॉ. संजय पाटील, ज्येष्ठ लेखक दिग्दर्शक कलावंत धनंजय सरदेशपांडे (पुणे), निर्माता, दिग्दर्शक व कलावंत राजेश पाठक (कल्याण), ज्येष्ठ रंगकर्मी संतोष बोंदरे (अलिबाग) व इतर दिग्गज कलावंताचे मार्गदर्शन लाभणार आहे. शेवटच्या दिवशी सहभागी सर्व शिबिरार्थींचे सादरीकरण होईल तसेच त्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

## भाताण बोगद्यात दुचाकीस्वार ठार

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील भाताण बोगद्यात कारच्या धडकेने मोटरसायकलस्वार ठार झाला. विशेष म्हणजे द्रुतगती मार्गावर दुचाकी, बैलगाडीसारख्या वाहनांना प्रवेशबंदी असताना तो या मार्गावरुन दुचाकीने जात होता.



मुंबई येथून पुणेकडे जाणारा मोटरसायकलस्वार द्रुतगती महामार्गाने सकाळी ६ वाजताच्या सुमारास जात असताना कारने त्याला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेला तरुण रोहीत विलास कदम (वय ३०, रा गावठाण, गोलेगाव, पुणे) हा जागीच ठार झाला शवविच्छेदनासाठी मृतदेह चौक येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

# वडघर मुद्रे येथील सरस्वती विद्यामंदिरात निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीचे धडे, शालेय मंत्रिमंडळाची निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

शाळांच्या सुरुवातीच्या दिवसात अनेक शाळांमधून शाळेच्या कामकाजाचे, व्यवस्थापनाचे धडे मिळावेत, लोकशाही पद्धतीची ओळख व्हावी यासाठी शालेय छात्र संसदेची निवड केली जाते .अनेक शाळांमधून ही छात्र संसद निवडणूक गुप्त मतदान व खुल्या मतदान पद्धतीने होत असून लोकशाहीतील मतदान प्रक्रिया व कामकाज प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजाऊन देण्याची ही पद्धती प्रभावी ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर सरस्वती विद्यामंदिर वडघर मुद्रे विद्यालयात शनिवार दिनांक २८ जून रोजी गुप्त पद्धतीने मतदान करून लोकशाहीच्या मार्गाने शालेय मंत्रिमंडळ निवडणुकीचा उपक्रम घेण्यात आला.



या निवडणुकीत शाळेतील ज्येष्ठ शिक्षकांनी निवडणूक अधिकारी ,आयुक्तांचे काम पाहिले व इतर शिक्षकांनी निवडणूक प्रक्रिया पार पाडली. यात प्रत्यक्ष बूथ उभारणी, चिन्हं असलेली मतपत्रिका इत्यादी बाबी पूर्ण करून निवडणूक घेण्यात आली.उमेदवारांचे अर्ज भरणे,छाननी करणे ,निवडणुकीसाठी प्रचार करणे, प्रत्यक्ष मतदान करून व मोजणी करून ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावुन सांगून निवडणूक घेण्यात आली. या सर्व प्रक्रियेत विद्यार्थी सहभागी झाले होते. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात या निवडणुका पार पडल्या असून सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

सदर उपक्रमामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून, मुलांमधून आणि मुलींमधून मंत्री मंडळाची निवड करण्यात आली. मतपत्रिका, मतदार यादी तयार करण्यात आली होती. प्रचाराची रणधुमाळी दोन दिवस चालली. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदान केंद्र सज्ज झाले. सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी होणाऱ्या गुप्त मतदानाप्रमाणेच गुप्त मतदान घेऊन, सर्व मतदान प्रक्रिया यथोचित आणि शांततेच्या मार्गाने पार पडली. नंतर मोजणी झाली. विजयी उमेदवारांचे सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी हार्दिक अभिनंदन केले.

## निवडक

### पोलिसाचा मुलगा बेपत्ता

**पनवेल :** केस कापण्यासाठी कॅम्प बाहेर गेलेला पोलीस हवालदाराचा मुलगा घरी परतला नाही. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. हनुमंत खुडे हे तळोजा येथील आर. एफ. कॅम्पमध्ये राहतात. १६ वर्षाचा मुलगा रात्री साडेआठच्या सुमारास केस कापण्यासाठी कॅम्प बाहेर गेला. बराच वेळ झाला तरी तो घरी परत आला नाही.

### रिक्षाच्या धडकेत महिला जखमी

**पनवेल :** रिक्षाच्या धडकेने एक महिला जखमी झाल्याची घटना शहरातील शिवशंभो नाका परिसरात घडली आहे. रेखा कांबळे (वय ५७) ही पनवेल परिसरात राहत असून, ती कामावरून घरी येण्यास निघाली. ती तक्का गाव शिवशंभो नाका येथे रस्ता ओलांडत असताना भरधाव आलेल्या रिक्षाचालकाने तिला धडक दिली. त्यामुळे जखमी झाली. याप्रकरणी रिक्षा चालकाविरोधात पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### पानमसाला, गुटखा हस्तगत

**पनवेल :** काळुंद्रे गाव येथील तीन वेगवेगळ्या किराणा दुकानात पनवेल शहर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणात हजारो रुपये किंमतीचा सुगंधी पानसाला व गुटख्याचा साठा पोलिसांनी हस्तगत केला आहे. महाराष्ट्रात गुटखा विक्रीस बंदी असतानासुद्धा अनेक जण याची छुप्या मार्गाने विक्री करीत असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून या तीन वेगवेगळ्या दुकानातून हजारो रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### प्रकाश ठाकूर यांना सेवानिरोप

**उरण :** तालुक्यातील भेंडखळ येथील प्रबोधन कवी म्हणून प्रसिद्ध असलेले प्रकाश ठाकूर यांचा सेवापुर्ती सोहळा खोपटे येथे झाला. त्यांनी भेंडखळ येथील बि.पि.सी.एल.या भारत सरकार अंतर्गत कंपनीत ३४ वर्षे सेवा केली. या सेवापुर्ती समारंभाचे निमित्त साधून त्यांनी लिहिलेल्या दक्ष कामगार या पुस्तकाचे प्रकाशन आगरी साहित्य विकास मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मोहन भोईर यांच्या हस्ते करण्यांत आले. या वेळी कवयित्री दमयंती भोईर, ए. डी. पाटील, काशिनाथ मढवी, अॅड. चंद्रकांत मढवी, बी. पी.म्हात्रे, वसंत मोहिते, भगवान म्हात्रे, रा. ऊ.म्हात्रे, एकनाथ म्हात्रे, के. एस. ठाकूर, जनार्दन पाटील, हरिश्चंद्र माळी, शाहीर अनंत पाटील, अॅड. मनोज म्हात्रे, म.वा. म्हात्रे, स्मिता वाजेकर, मिनल माळी आदी उपस्थित होते.



# पनवेल परिसरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ

## तोतया पोलिसांनी महिलेसह तिघांना लुबाडले

**पनवेल : वार्ताहर**



पोलीस असल्याची बतावणी करून तसेच बोलण्यात गुंतवून ज्येष्ठ नागरिक व महिलांना लुटणाऱ्या भामट्यांनी मागील दोन दिवसांमध्ये पनवेल आणि कामोठे भागातील एका महिलेसह तीन व्यक्तींजवळचे सुमारे तीन लाख रुपये किमतीचे दागिने लुबाडल्याचे उघडकीस आले आहे. त्यांच्या विरोधात पनवेल आणि कामोठे पोलिसांनी गुन्हे दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

पनवेलमध्ये घडलेल्या पहिल्या घटनेत प्रभाकर म्हात्रे (वय ६६) हे चिकन घेऊन घरी येत असताना येथील घोडके हॉस्पिटलजवळ पोलिसाचा गणवेश घालून मोटारसायकलवरून आलेल्या दोघा तोतया पोलिसांनी म्हात्रे यांना अडवले व ते स्पेशल बॅचचे पोलीस असल्याचे सांगून चरस-गांजा तस्करी करणार्या लोकांना तपासण्याचे काम करत असल्याचे सांगून म्हात्रे यांची अंगझडती घेण्याच्या बहाणा करत त्यांच्या हातातील सोन्याची अंगठी व सोन्याची चेन असा ७५ हजारांचा ऐवज काढून घेतला. त्यामुळे म्हात्रे यांनी आरडाओरड केली असता, या दोघांनी तेथून म्हात्रे यांचा सोन्याचा ऐवज घेऊन पलायन केले. त्यानंतर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

कामोठे सेक्टर-१८ मध्ये घडलेल्या दुसर्या घटनेत पंढरीनाथ कासविद (७५) हे सकाळी फेरफटका मारण्यासाठी गेले होते. त्यांनादेखील दोघा भामट्यांनी पोलीस असल्याची बतावणी करत पंढरीनाथ यांची तपासणी करण्याच्या बहाण्याने त्यांची सोन्याची चेन व अंगठी काढून घेतली. व त्यानंतर त्यांनी हे दागिने त्यांच्या खिशात ठेवण्याचा बहाणा करून ते घेऊन पसार झाले. काही वेळाने पंढरीनाथ यांनी खिसा तपासला असता, त्यात दागिने नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

कामोठे सेक्टर-३४ येथे घडलेल्या तिसऱ्या घटनेत दोघा भामट्यांनी त्यांच्या शेठला मुलगा झाल्याने तो मोफत रेशन वाटत असल्याचे सांगून विमल चिकणे (वय ५८) यांना सोबत नेले. त्यानंतर त्यांनी विमल यांना गळ्यातील मंगळसूत्र आणि कानातील सोन्याची फुले काढून कापडी पिशवीमध्ये ठेवण्यास सांगितले. त्यांनी विमल यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या दागिन्यांची पिशवी या दोघांपैकी एकाने आपल्याकडे घेत तेथून पसार झाले. काही वेळानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## सायबर टोळीचा पोलिसाला ५५ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**



अज्ञात सायबर टोळीने एका पोलीस कर्मचार्याला ५५ लाखांचा गंडा घातल्याचे प्रकरण समोर आले आहे. सोशल मीडियावर आलेल्या बनावट गुंतवणूक जाहिरातीवर विश्वास ठेवून ही फसवणूक घडल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी नवी मुंबईच्या सायबर पोलिसांनी अज्ञात सायबर टोळीविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

हे पोलीस कर्मचारी त्यांच्या कुटुंबासह खारघर परिसरात राहत असून, ते मुंबई पोलीस दलात संरक्षण शाखेत कार्यरत आहेत. गेल्या १५ जानेवारी रोजी त्यांना फेसबुकवर १८ हजार रुपये गुंतवल्यास दररोज १२०० रुपयांचा नफा मिळेल, अशी मुकेश अंबानी यांच्या नावाने गुंतवणुकीबाबतची एक जाहिरात निदर्शनास आली. त्यावर त्यांनी या जाहिरातीच्या लिंकवर जाऊन त्यात मोबाईल क्रमांक नोंदवला. त्यावर आशिष मिश्रा या व्यक्तीने फिन ब्रिज कॅपिटल या कंपनीचा अॅडव्हायझर असल्याचे भासवून या पोलिसाला संपर्क साधत त्यांना सुरुवातीला २२ हजार रुपये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे सांगितले असता त्यांनी १९,५०० रुपयांची गुंतवणूक केली. त्यावर या टोळीने त्यांना नफ्याचे बनावट स्क्रिन शॉट पाठवले. त्यानंतर नफा मिळतोय या आशेने या पोलिसाने दुसर्या गुंतवणुकीच्या प्लॅनमध्ये साडेतीन लाख रुपये भरले.

या गुंतवणुकीवर त्यांना ८३ लाख ९६ हजार रुपये नफा झाल्याचे भासवण्यात आले. त्यानंतर त्यांच्याकडून आणखी पैशांची मागणी केली. ही रक्कम भरल्यानंतर या टोळीने त्यांना बार्कलेस बँकेच्या नावाने बनावट पावत्याही पाठवल्या. मात्र एवढी रक्कम भरुनही परतावा मिळत नसल्याने या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार दाखल केली.

## खारघरमध्ये स्पा सेंटरवर छापा

**पनवेल : वार्ताहर**



खारघरमधील उच्चभ्रू परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखेने एका स्पावर छापा टाकून मोठी कारवाई केली.

'व्हाईट ऑर्चिड स्पा' या नावाने सुरू असलेल्या या ठिकाणी महिलांकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे उघडकीस आले असून, याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खारघरमधील सेक्टर ८ येथील शेल्टर कॉम्प्लेक्समधील प्लॉट क्रमांक १२ बी, शॉप नंबर १२ येथे 'व्हाईट ऑर्चिड स्पा'च्या नावाखाली येथे ही संशयास्पद हालचाल सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला मिळाली होती. प्राप्त माहितीनुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खात्री करून घेतली आणि लगेचच धडक कारवाई करत या स्पा सेंटरवर छापा टाकला.

छाप्यात सात महिला रूममध्ये आढळून आल्या. प्राथमिक चौकशीत या महिलांकडून बेकायदेशीर वेश्याव्यवसाय करून घेतल्याचे स्पष्ट झाले. यावरून संबंधित स्पा व्यवस्थापक व इतर दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास करण्यात येत आहे.

## चेन खेचून दोघे पळाले

**पनवेल : वार्ताहर**

शिवीगाळ केल्याने विचारणा केली असता एकाने कॉलर पकडली आणि दुसऱ्याने गळ्यातील दोन चेन जबरीने खेचून ते दोघेजण पळून गेल्याप्रकरणी दोघांविरोधात खांदेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उदयसिंग खरवड हे सेक्टर ४, नवीन पनवेल येथे राहत असून ते जलाराम हॉटेल येथून जेवण करून घरी जाण्यासाठी अंबामाता मंदिर, नवीन पनवेल येथून जात होते. रात्री साडेअकराच्या सुमारास दोन जण सिगारेट पीत होते. त्यांनी विनाकारण शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांना शिवीगाळीचे कारण विचारण्यासाठी उदयसिंग जवळ गेले असता एकाने त्यांची कॉलर पकडली तर दुसऱ्या व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील दोन सोन्याचे चेन जोरात खेचून त्यांना धक्का देऊन खाली पडले.

## पनवेल शहर पोलिसांकडून लाखोंचे हेरॉईन हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी कर्नाळा स्पोर्टस अॅकॅडमी ते टी पॉईंटकडे जाणाऱ्या रोडवरील ब्रीजजवळ सापळा रचून दोघा व्यक्तींना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून जवळपास एक लाख पाच हजार रुपये किमतीचे हेरॉईन हा अमली पदार्थ हस्तगत केला आहे.

पंजाब येथून सतनाम सिंग सुखदेव सिंग (वय ३१) व सुखविंदर सिंग मुकनार सिंग (वय ५९) हे दोघे जण बेकायदेशीररित्या अंमली पदार्थ घेवून येणार असल्याची माहिती वपोनि नितीन ठाकरे यांना मिळाली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.अभिजीत अभंग, पोउपनि हजरत पठाण, पो.ना.प्रवीण मेथे, पो.ना.रवींद्र पारधी, पो.शि.साईन मोकळ, पो. शि.शशिकांत काकडे आदींच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे ३५ ग्रॅम वजनाचा हेरॉईन हा अंमली पदार्थ आढळून आला. सदर अंमली पदार्थ कोणास देण्यासाठी आणला होता याबाबत पुढील तपास पोउपनि हजरत पठाण करीत आहेत.



पनवेल : राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषद २०२५चे आयोजन नागपूर येथे करण्यात आले होते. या वेळी भाजप अनुसूचित जाती सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती लाभली.

## आदिवासींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**उरण : बातमीदार**




श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने उरण तालुक्यातील आदिवासी कातकरी पिरवाडी येथे जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले. तसेच महिला व लहान मुलांचे चेकअप देखील करण्यात आले व मोफत औषधे वाटण्यात आली. ३८ जणांनी वैद्यकीय तपासणीचा लाभ घेतला.

शिवराज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संदेश भाई ठाकूर, समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था कार्याध्यक्ष संगीता ढेरे (रायगड भूषण) कविता म्हात्रे, पूजा प्रसादे, मीना रावल, विशाखा म्हात्रे, अनघा ठाकूर, रश्मी तांबे, सीमा निकम, सुमन ताई तोगरे, तृप्ती भोईर, श्रेया ठाकूर, योगेश म्हात्रे, उमेश वैवडे, सचिन ढेरे, केशव निकम, दिनेश हळदणकर, अमर ठाकूर, आनंद ठक्कर, घनश्याम भोईर, सुभाष पाटील, संग्रामकाका तोगरे, दीपक प्रसादे या सर्वांचे सहकार्य या उपक्रमाला लाभले आहे.

श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या उपक्रमाला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला असून या कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

## वीर वाजेकर महाविद्यालयात कायदेविषयक जनजागृती शिबिर

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुका विधी सेवा समिती व उरण तालुका वकील संघटना व वीर वाजेकर महाविद्यालयफुंडे (उरण), यांच्या संयुक्त विध्यमाने सोमवार (दि.३०) रोजब 'कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.




या शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून उरणचे सह दिवाणी न्यायाधीश एस.पी. वानखेडे, प्रमुख न्यायाधिश एम.एस. काझी, तसेच उरण न्यालयीन अंतर्गत वकील उपस्थित होते. अनुराग ठाकूर यांनी जागतिक बालमजुर दिनाच्या निमित्ताने बालमजूर आणि जागतिक स्तरावरील समस्यांचे विश्लेषण केले.बालमजूर कसे तयार होतात. त्याच वय किती असते तसेच बालमजूर कायद्याच्या अंतर्गत गुन्हेगाराला शिक्षा कशी होते. याविषयी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना याविषयी जागृती व्हावी, या विषयाची गंभीरता तरुणांच्या समजावी आशा सोप्या भाषेत अनुराग ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. अभिषेक म्हात्रे यांनी अमली पदार्थ सेवन व विक्री या कायद्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आजचा तरुण अमली पदार्थ सेवणाच्या आहारी जात आहे,तसेच कमी वयाच्या मुलांकडून अमली पदार्थ विक्री अवैध पध्दतीने कशी केली जाते. यात अडकलेल्या तरुणांना कसे काढता येईल व कायदा कशा पद्धतीने काम करतो याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.एम.एस.काझी साहेबांनी युनोमध्ये संबंधित कायद्या संदर्भात माहिती दिली. व्ही.एल.पाटील अध्यक्ष बार असोसिएशन उरण तसेच उरण तालुका वकील संघटनेचे वकील उपस्थित होते.

महाविद्यालयचे प्रभारी डॉ.आमोद ठाकूर, प्राचार्य, उपप्राचार्य प्रा.गजानन चव्हाण, प्रा.बळीराम पवार, प्रो.अनिल पालवे, प्रा.प्रांजल भोईर, डॉ.सुजाता पाटील, महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## अपघातामध्ये दाम्पत्य जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

कारची धडक लागल्याने दुचाकीवरील दाम्पत्य गंभीर जखमी झाले आहेत. सीबीडी उड्डाणपुलावर हा अपघात घडला. याप्रकरणी सीबीडी पोलिसांनी अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

उरण येथे राहावयास असलेल्या किरण चौधरी (वय ३६) या पती अखिलेश चौधरी याच्यासोबत पनवेल येथे खरेदीसाठी गेल्या होत्या. खरेदी करून घरी येताना सीबीडी उड्डाणपुलावर अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात किरण चौधरी यांना डोक्याला, खांद्याला आणि हाताला गंभीर इजा झाली आहे, तर पती अखिलेश यांच्या डोक्याला, खांद्याला आणि छातीला जबर दुखापत झाली आहे. अखिलेश यांच्यावर सीबीडी येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर किरण यांच्यावरही याच उपचार सुरू आहेत.

## राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी रावसाहेब बुधे

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झालेल्या राजमाता अहिल्यादेवी सेवा संस्था, कामोठे या संस्थेच्या नऊ वर्षांनी पदाधिकाऱ्यांची फेरबदल करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष सुषमा पाटील विद्यालयाचे चेअरमन दिलीप पाटील ही काही कालावधीसाठी पदभार सांभाळत होते. नंतर गणेश बेरगळ यांनी गेले दहा वर्ष अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. आता २०२५पासून सचिव म्हणून काम पाहणारे रावसाहेब बुधे यांची बिनविरोध अध्यक्षपदी निवड झाली.



कैलास सरगर यांची सचिव पदी निवड झाली. गणेश बेरगळ यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली उपाध्यक्षपदी पांडुरंग यमगर व खजिनदार अशोक माने हे पुन्हा त्याच पदावरती निवड करण्यात आली सहखजिनदार विजय सरगर व सहसचिव अर्जुन गावडे यांची निवड करण्यात आली आणि सल्लागार म्हणून नानासाहेब बुधे सर व किसन यमगर मेजर यांची निवड करण्यात आली आहे.

सदस्य म्हणून माणिक सरगर, नानासाहेब मगदुम, उल्हास धायगुडे, एकनाथ हुबाळे, विलास पुकळे, रावसाहेब कोळेकर असणार आहेत.

दरम्यान, संस्थेच्या माध्यमातून अनेक विविध कार्यक्रम केले जातात महिलांसाठी हळदीकुंकू दसऱ्यानिमित्त वीस ते पंचवीस गावचे गजी मंडळ कामोठ्यात आणले जातात अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते.

## ब्राम्हण सभेतर्फे संततधार कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

ब्राम्हण सभा उरण वतीने दर वर्षा प्रमाणे यंदाही संततधार कार्यक्रम श्री गणपती मंदिर उरण, गणपती चौक उरण येथे आयोजित करण्यात आला होता.

शनिवारी ते रविवारपर्यंत अखंड २४ तास अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम झाला. ब्राम्हण महिला मंडळ यांनी दुपारी ४ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अथर्वशीर्ष पठण केले.



या वेळी श्रीधर मोहोळकर, प्रभाकर दाते, वैभव राईलकर, हेमंत धामणकर, धनजंय उपाध्ये, अथर्व उपाध्ये, चंद्रकांत साठे, विराम उपाध्ये, दिलीप जोशी, मोहन त्याडी, संजय दाते, मंदार देशमुख, सुर्यकांत दांडेकर, सुशांत जोशी, ब्राम्हण सभा अध्यक्ष, कार्यकारी मंडळ विस्तारित मंडळ, ब्राम्हण महिला मंडळ कार्यकारी मंडळ यांचे सहकार्य मिळाले.

## संपादकीय

# राज्यात माय मराठीलाच प्राधान्य

राज्य सरकारने तृतीय भाषेसंदर्भात जारी करण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय रद्द केले तसेच राज्यात सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून मराठी भाषा सक्तीची असल्याचे स्पष्ट केले. त्याचवेळी विद्यार्थी हिताचा निर्णय घेण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती सरकारने स्थापन केली आहे.

**राज्यात त्रिभाषा सूत्रांतर्गत विद्यार्थ्यांना पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या निर्णयावरून गेल्या काही दिवसांपासून राज्यात मोठा वाद सुरू होता. वास्तविक राज्यात सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून मराठी भाषा सक्तीची असून हिंदी पर्यायी आहे. तरीही विरोधकांनी याचे राजकारण केले. या निर्णयाविरोधात मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडून मोर्चादेखील काढण्यात येणार होता. राज्यातील वातावरण बिघडू नये, म्हणून राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा करीत हिंदी भाषेसंदर्भातील शासन निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला तसेच त्रिभाषा सूत्र लागू करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार सोबत उपस्थित होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे त्रिभाषा सूत्राबाबत सांगोपांग अभ्यास करून तसेच भविष्यात महत्वाच्या ठरणाऱ्या अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटचे महत्त्व विचारात घेऊन विद्यार्थी हिताचा निर्णय घेण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. या समितीचा अहवाल येईपर्यंत तृतीय भाषा संदर्भातील काढण्यात आलेले राज्य सरकारचे १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजीचे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत. या संदर्भात माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांवर शरसंधान साधत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची दुटप्पी भूमिका सर्वांसमोर आणली. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ समिती नियुक्त केली होती. या समितीने उद्धव ठाकरे यांना अहवाल सादर केला, ज्यामध्ये इंग्रजी आणि हिंदी ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्गापासून लागू करण्यात यावी, पहिली ते बारावी विद्यार्थी इंग्रजी शिकतील तर त्यांना इंग्रजी भाषेची जाण येईल व आवश्यक पुस्तके वाचता येतील, इंग्रजी आणि हिंदी ही दुसरी भाषा म्हणून पहिली ते बारावीपर्यंत सक्तीची करण्यात यावी, आवश्यकता भासत असेल तर पदवी अभ्यासक्रमामध्ये ही हिंदी सक्तीची करण्यात यावी, असे नमूद केले होते. हा अहवाल सादर झाल्यानंतर पुढे मंत्रिमंडळापुढे आला आणि कायम झाला. याकडे लक्ष वेधत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा समाचार घेत सांगितले की, हा अहवाल स्वीकारताना त्रिभाषा सूत्र बाजूला ठेवा हे आम्हाला मान्य नाही, पण उद्धव ठाकरे सरकारच्या काळात मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय घेऊन त्याला मान्यता देण्यात आली आणि अंमलबजावणीसाठी नियम तयार करण्यासाठी त्यावर समिती तयार करण्यात आली. याच कमिटीच्या कामावर आमचे शासन निर्णय निघाले आहेत. सत्तेत असताना वेगळे बोलायचे आणि सत्तेतून बाहेर आले की वेगळी भूमिका घ्यायची, यावर खरंतर पहिला प्रश्न राज ठाकरेंनी उद्धव ठाकरे यांना विचारला पाहिजे की तुम्हीच तर याला मान्यता दिली होती. आता कुठल्या तोंडाने आंदोलन करायला निघालात? असा टोलाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी लगावला. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या हिताचे जे असेल, तोच निर्णय महाराष्ट्र सरकार घेईल. कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, असेदेखील सांगत सरकारची भूमिका मांडली. एकंदर महाराष्ट्रात माय मराठीलाच प्राधान्य असेल आता स्पष्ट झाले आहे.**

# वीजबिलाचा अंक, मिळेल मागेल त्याला सौर पंप!

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये सध्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' या योजनेविषयी चर्चा सुरू आहे. राज्य सरकारने मागेल त्याला सौरपंप ही योजना आणली आहे. याअंतर्गत ९ लाख सौरपंप मंजूर करण्यात आले आहेत. आपण 'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही योजना काय आहे, या योजनेसाठी अर्ज कसा करायचा आणि लाभार्थी निवड कशी होणार, याची सविस्तर माहिती या लेखाच्या माध्यमातून पाहणार आहोत.





**मागेल त्याला सौर पंप योजना काय आहे?**

शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध व्हावी, या हेतूने राज्य सरकारने मागेल त्याला सौर पंप योजना आणली आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेतीच्या क्षेत्रानुसार ३,५,७.५ अश्वशक्ती (क्ष्म) क्षमतेचे पंप दिले जाणार आहेत. सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी सौर कृषी पंप किंमतीच्या १०% रक्कम, तर अनुसूचित जाती जमातींच्या शेतकऱ्यांसाठी सौर कृषी पंप किंमतीच्या ५ % रक्कम भरून सौर पंपाचा पूर्ण संच दिला जाणार आहे. उर्वरित रक्कम राज्य व केंद्र सरकारकडून अनुदान म्हणून दिली जाणार आहे.

**पैशांच्या स्वरुपात पाहिल्यास साधारणपणे शेतकऱ्यांना भरावी लागणारी रक्कम पुढीलप्रमाणे असणार आहे.**

- ३ HP क्षमतेचा पंप – १७,५०० ते १८,००० रुपये
- ५ HP क्षमतेचा पंप – २२,५०० रुपये
- ७ HP क्षमतेचा पंप – २७,००० रुपये

सौर कृषी पंपाची देखभाल व दुरूस्तीचा कालावधी ५ वर्ष राहणार आहे. या कालावधीत सौर कृषी पंप नादुरूस्त झाल्यास विनामुल्य दुरुस्ती करण्याची जबाबदारी अर्ज करताना शेतकरी जी एजन्सी निवडणार आहे, त्या एजन्सीची राहणार आहे. तसेच, वादळासारख्या नैसर्गिक आपत्तीत सौर पॅनेलचे नुकसान झाल्यास, त्याची चोरी किंवा तोडफोड झाली तर एजन्सीकडून विम्याचे संरक्षणही मिळणार आहे.

**लाभार्थी निवड कशी होणार?**

ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याचा स्रोत (विहिर, शेततळे, बोअरवेल इ.) उपलब्ध आहे आणि ज्या ठिकाणी यापूर्वी पारंपरिक कृषी पंपाकरता वीज पुरवठा देण्यात आला नाही असे शेतकरी या योजनेसाठी अर्ज करू शकणार आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या क्षेत्रानुसार पंप दिले जाणार आहेत. त्यात, २.५ एकरपर्यंत शेतजमीन असेल तर ३ क्ष्म क्षमतेचा पंप दिला जाईल. २.५ ते ५ एकरपर्यंत शेतजमीन असेल तर ५ क्ष्म क्षमतेचा पंप दिला जाईल. ५ एकरपेक्षा जास्त शेतजमीन असेल तर ७.५ क्ष्म क्षमतेचा पंप देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या क्षेत्रानुसार सौर पंप दिला जाणार आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या क्षेत्रानुसार सौर पंप दिला जाणार आहे. याशिवाय, वैयक्तिक किंवा सामूहिक शेततळे,
विहिर, बोअरवेल, बारमाही वाहणारी नदी/नाले यांच्या शेजारील शेतकरी या योजनेसाठी पात्र राहतील. तसेच अटल सौर कृषी पंप योजना–१, अटल सौर कृषी पंप योजना–२ आणि मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना या योजनांचा लाभ न घेतलेले शेतकरी देखील या योजनेसाठी अर्ज करू शकणार आहेत.

**अर्ज कुठे व कसा करायचा?**

मागेल त्याला सौर पंप योजना राबवण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी तुम्ही कधीही अर्ज करू शकता. अर्ज करण्यासाठी कोणतीही मुदत देण्यात आलेली नाही. ऑनलाईन किंवा ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने अर्ज करता येतो. ऑफलाईन अर्ज जवळच्या महावितरणच्या कार्यालयात जाऊन करता येतो. ऑनलाईन अर्ज महावितरणची अधिकृत वेबसाईट्‌ु.ारहरवळीलो.ळप वर शेतकरी स्वत: करू शकतात.

**महावितरणची अधिकृत वेबसाईट**

या वेबसाईटवर गेल्यास उजवीकडे 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक केल्यास नवीन पेज ओपन होईल. उजवीकडे वरती असलेल्या 'भाषा' पर्यायावर क्लिक करुन तुम्ही मराठी किंवा इंग्रजी भाषा निवडू शकता. इथल्या 'लाभार्थी सुविधा' पर्यायावर जाऊन 'अर्ज करा' या पर्यायावर क्लिक करायचं आहे. त्यानंतर योजनेसाठीचा अर्ज तुम्हाला दिसेल. यात पुढील माहिती तुम्हाला भरायची आहे.

याआधीची कृषीपंप वीज जोडणी प्रलंबित असेल तर तो तपशील,अर्जदाराचा वैयक्तिक आणि जमिनीचा तपशील,अर्जदाराचा रहिवाशी पत्ता व ठिकाण, जलस्रोत आणि सिंचन माहिती, कृषी तपशील, विद्यमान पंप तपशील आवश्यक, तपशील बँक तपशील त्याखाली आलेले घोषणापत्र व्यवस्थित वाचून त्यासमोरील डब्ब्यात बरोबरची टिक करायची आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

ही सगळी माहिती भरुन झाली की कागदपत्रे अपलोड करायची आहे. त्यात, सातबारा उतारा (विहीर/कुपनलिका शेतात असल्यास सातबारा उताऱ्यावर नोंद आवश्यक ) एकापेक्षा जास्त नावे असल्यास इतर भोगवटादाराचे ना–हरकत प्रमाणपत्र २०० रुपयांच्या मुद्रांक कागदवर. आधारकार्ड प्रत, बँक पासबुक प्रत, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, अनुसुचित जाती/जमातीचे प्रमाणपत्र, ही सगळी माहिती भरुन झाली की, 'अर्ज सादर करा' या पर्यायावर क्लिक करायचं.

**अर्ज केल्यानंतर पुढे काय?**

अर्ज सादर केल्यानंतर अर्जदारास त्याच्या मोबाईल क्रमांकावर लाभार्थी क्रमांक व इतर तपशील पाठवला जाईल. हा लाभार्थी क्रमांक वापरुन या वेबसाईटवरील अर्जाची स्थिती या पर्यायावर क्लिक केल्यास, तुम्ही तुमच्या अर्जाची सद्यस्थिती पाहू शकता. सोबतच, तुम्हाला देय असलेली रक्कम भरू शकता आणि पुरवठादार एजन्सीची निवड करू शकता. एकूण १४ एजन्सीमार्फत ही योजना राबवण्यात येत आहे, त्यापैकी एक एजन्सी तुम्हाला निवडायची आहे. लाभार्थी अर्जदाराने अर्ज केला की तुम्ही निवडलेली एजन्सी आणि महावितरणचे कर्मचारी संयुक्तपणे तुमच्या शेतात करुन माहितीची पडताळणी करतात. सर्व्हे करतात. सर्व माहिती योग्य असेल तर मग तुम्हाला योजनेसाठी पात्र आहात की नाही ते ठरवलं जातं आणि मग सौरपंप इन्स्टॉलेशनचे काम सुरू होते. मागेल त्याला सौर पंप योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी अडचणी आल्यास, सौर कृषी पंप नादुरुस्त झाल्यास, सौर कृषी पंपाच्या साहित्याची चोरी झाली किंवा नुकसान झाल्यास महावितरणचे अधिकृत टोल फ्री नंबरवर संपर्क करू शकता. ते नंबर असे आहेत १९१२ / १९१२० किंवा १८००–२१२–३४३५ किंवा १८००–२३३–३४३५

**–रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## बदलते तंत्रज्ञान

# पेटीएमचे नवीन फीचर 'टोटल बॅलन्स व्ह्यू'

पेटीएम वापरकर्ते आता फक्त एकदाच यूपीआय पिन टाकून त्यांच्या सर्व बँक खात्यांमधील एकूण रक्कम तपासू शकतील. यासाठी, डिजिटल पेमेंट कंपनी पेटीएमने त्यांच्या ॲपमध्ये 'टोटल बॅलन्स व्ह्यू' हे नवीन वैशिष्ट्य सादर केले आहे. या नवीन टूलद्वारे, यूपीआयशी लिंक केलेल्या सर्व खात्यांची एकूण रक्कम एकाच स्क्रीनवर दिसेल.




हे फीचर विशेषतः अशा लोकांसाठी उपयुक्त आहे ज्यांचे एकापेक्षा जास्त बँक अकाउंट आहेत आणि ते वेगवेगळ्या ॲप्सवर जाऊन बॅलन्स तपासतात. या फीचरमुळे युजर्सना आता वेगवेगळ्या बँक अकाउंटमधील बॅलन्स जोडण्याची गरज भासणार नाही.

या नवीन साधनाचा उद्देश वेगवेगळ्या खात्यांची शिल्लक स्वतंत्रपणे तपासण्याची गरज दूर करून पैशाचे व्यवस्थापन सोपे करणे आहे. याचा अर्थ असा की तुम्ही आर्थिक नियोजन, बजेटिंग, खर्च नियंत्रित करणे आणि बचत करणे यासारखी कामे सहजपणे करू शकाल.

**टोटल बॅलन्स व्ह्यू फीचर कसे वापरावे**

पेटीएम ॲप उघडा आणि 'बॅलन्स अँड हिस्ट्री' सेक्शनवर क्लिक करा.जर तुम्ही आधीच णझख बँक खात्यांशी लिंक केले नसेल तर ते लिंक करा.प्रत्येक लिंक केलेल्या खात्यावर टॅप करा आणि शिल्लक तपासण्यासाठी णझख पिन प्रविष्ट करा.हे ॲप स्क्रीनवर सर्व लिंक केलेल्या खात्यांची एकूण रक्कम आपोआप दाखवेल.

पेटीएमची सुरुवात २००९ मध्ये झाली. पेटीएमची मूळ कंपनी वन९७ कम्युनिकेशन्सने ऑगस्ट २००९ मध्ये पेटीएम पेमेंट ॲप लाँच केले. त्याचे संस्थापक विजय शेखर शर्मा आहेत. सध्या देशात पेटीएमचे ३० कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत. पेटीएमचे मार्केट कॅप सुमारे २८ हजार कोटी रुपये आहे.

णझख सेवेसाठी, तुम्हाला एक व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस तयार करावा लागेल. त्यानंतर, तो बँक खात्याशी लिंक करावा लागेल. यानंतर, तुमचा बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव किंवा खऋडउ कोड इत्यादी लक्षात ठेवण्याची आवश्यकता नाही पेमेंट करणारी व्यक्ती तुमच्या मोबाइल नंबरनुसार पेमेंट रिक्वेस्टवर प्रक्रिया करते.

# अंतराळवीर कल्पना चावला

काही लोक निधनांनतरही आपल्या आठवणीत सदैव जिवंत राहतात. अंतराळवीर कल्पना चावला यांचा शेवटचा अंतराळ प्रवास अनेकांच्या मनात कोरला आहे. १७ मार्च १९६२ रोजी जन्मलेली कल्पना चावला यांचं बालपण हरियाणाच्या कर्नालमध्ये गेलं. त्या अंतराळात भरारी घेणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.

१९७६ साली कर्नाल टागोर स्कूलमधून त्यांनी शालेय शिक्षण पूर्ण केलं. तर १९८२साली पंजाब इंजिनीअरिंग कॉलेजमधून वैमानिक इंजिनीअरिंग मध्ये पदवी घेतली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्या अमेरिकेला गेल्या.१९८४मध्ये टेक्सास युनिव्हर्सिटीतून वैमानिक इंजिनीअरिंगमध्ये त्यांनी मास्टर्स पूर्ण केलं.

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था इथं कल्पना यांनी १९८८पासून फ्लुइड डायनॅमिक्समध्ये संशोधनाला सुरुवात केली. नासामध्ये काम केल्यानंतर ओवरसेट मेथड्स कंपनीत उपप्रमुख म्हणून रुजू झाल्या. त्याठिकाणी त्यांनी एरोडायनॅमिक्समध्ये महत्त्वपूर्ण संशोधन केलं. त्यांचे रिसर्च पेपर अनेकदा चर्चेत राहिले.नासाने १९९४ साली संभाव्य अतंराळवीराच्या यादीत कल्पना यांचा समावेश केला. मार्च १९९५ साली अंतराळ क्षेत्राचा विशेष अभ्यास करण्यासाठी



### निमित्त

नासाच्या जॉनसन एरोनॉटिक्स सेंटरमध्ये प्रशिक्षण चालू केलं.त्या दरम्यान त्यांना अंतराळवीरांच्या १५व्या फळीत ठेवण्यात आलं. तसंच एका वर्षाच्या प्रशिक्षणानंतर अंतराळयानाच्या नियंत्रण कक्षाच्या देखभालीचं काम देण्यात आलं.नोव्हेंबर १९९६मध्ये नासानं एक घोषणा केली. त्यामध्ये –TS–८७ मिशनच्या संशोधनाची जबाबदारी कल्पना याच्याकडं सोपवण्यात आली.

१९ नोव्हेंबर १९९७. त्यादिवशी हरियाणाच्या मुलीनं अंतराळात झेप घेतली. त्यावेळी त्यांनी ३७६ तास आणि ३४ मिनिटं अंतराळात घालवली.एका महत्त्वपूर्ण योजनेचं नेतृत्व करणाऱ्या कल्पना आणि त्यांच्या टीमने पृथ्वीला २५२ फेऱ्या मारल्या म्हणजे त्यांनी १ कोटी ४६ हजार किमीहून अधिक प्रवास केला.

कल्पना यांचा शेवटचा प्रवास नासाने जेव्हा एक महत्त्वपूर्ण योजना आखली तेव्हा अनुभवी अंतराळवीर कल्पना चावला ७ सदस्यांच्या टीममध्ये महत्त्वाची जबाबदारीही त्याच्याकडं देण्यात आली.जानेवारी २००३च्या १६ दिवसांच्या मिशनमध्ये त्यांची विशेष तज्ज्ञ म्हणून नेमणूक केली. अंतराळात केले जाणारे प्रयोग हे कल्पना यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले होते.

१ फेब्रुवारी २००३ला कोलंबिया अंतराळ यानाने पृथ्वीकडं येण्यासाठी अमेरिकेजवळच्या पॅसिफिक समुद्राकडं झेप घेतली. अंतराळवीरांनी स्पेस सुट घातला. त्यावेळी सर्व योग्यरीत्या सुरू होतं. त्यावेळी स्थानिक वेळेनुसार सकाळच्या ८.४० वाजता कोलंबिया यानानं पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला. अंतराळवीर आणि नासातल्या अंतराळयान नियंत्रण कक्षातले सगळेजण आनंदी होते.२२ मिनिटांत ते यान पृथ्वीवर उतरणार होतं. सुमारे ८.५४ वाजता यानाचा आणि नियंत्रण कक्षाचा संपर्क तुटायला सुरुवात झाली. ९.१६ वाजता काही गोष्टी स्पष्ट व्हायला लागल्या आणि कोलंबिया यान इतिहासात जमा झालं. तेव्हा कोलंबिया स्पेस शटलचा अपघात झाला आणि त्यातच सगळ्या अंतराळवीरांचं निधन झालं. **(साभार : इंटरनेट)**

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर



# ही फळे खाल्ल्यास आजारांशी लढण्याचीही मिळेल ताकद!

तुम्हालाही आपल्या शरीराचे संरक्षण करण्यासाठी व्हिटॅमिन सी खूप महत्वाचे आहे. व्हिटॅमिन सी हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. व्हिटॅमिन सी पुरेशा प्रमाणात सेवन केल्यास हृदयाशी संबंधित रोग, आरोग्य समस्या आणि त्वचेशी संबंधित समस्या दूर राहण्यास मदत होते. व्हिटॅमिन सी संपूर्ण आरोग्यास चालना देते. व्हिटॅमिन सी जखमा लवकर भरून काढण्यासाठी खूप उपयुक्त आहे.

तसेच व्हिटॅमिन सी मुळे, कूर्चा, हाडे आणि दातांची झीज कमी होते. संत्र्यामध्ये सर्वात जास्त व्हिटॅमिन सी असते असे सर्वसाधारणपणे समजले जाते. पण आपण अशा अनेक फळांबद्दल जाणून घेऊया ज्यात संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते आणि ती लिंबूवर्गीय फळे नाहीत.

पेरू – पेरू हे भारताच्या कानाकोपऱ्यात आढळणारे फळ आहे. पेरूमध्येही संत्र्यापेक्षा जास्त व्हिटॅमिन सी असते. १०० ग्रॅम पेरूमध्ये २२८ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते.

अननस – अननस हे अतिशय चविष्ट फळ आहे. ते जितके चवदार असेल तितकेच ते व्हिटॅमिन सीने भरलेले असते. १०० ग्रॅम अननसात ४८ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते. यामध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडंट असतात जे रोगांशी लढण्यासाठी उपयुक्त असतात.

आंबा – आंब्याला फळांचा राजा म्हटलं जातं. सध्या सर्वत्र आंब्यांचा घमघमाट आहे. आंब्यामध्ये व्हिटॅमिन सी देखील मुबलक प्रमाणात ढळते. १०० ग्रॅम आंब्यामध्ये ३६ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते. आंब्यामध्ये फायबरही भरपूर प्रमाणात असते.

कीवी – किवीला चायनीज गूसबेरी असेही म्हणतात. किवी हे एक अतिशय चवदार फळ आहे जे थोडेसे आंबट असते. त्यात ९३ मिलीग्राम व्हिटॅमिन सी आढळते. किवीमुळे रोगप्रतिकारशक्ती देखील वाढते आणि ते कोलेस्ट्रॉल देखील कमी करते.

या फळांच्या नियमित सेवनाने तुम्हाला पोषण मिळेल, व्हिटॅमिन सी चे प्रमाणही वाढेल आणि रोगप्रतिकारक शक्तीही खूप वाढेल.

# माणगावसह इंदापूर बायपासचे काम तातडीने सुरू करा

## खासदार सुनील तटकरेंचे निर्देश

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव येथील नेते ॲड. राजीव साबळे यांच्या आंदोलनाची दखल घेत माणगाव आणि इंदापूर येथील बायपासचे काम तातडीने सुरू झाले पाहिजे. हा बायपास माणगाव तालुक्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असून वाहतूक कोंडीतून मुक्तता मिळवण्यासाठी आणि अपघातात नाहक जाणारे निष्पाप जीव वाचवण्यासाठी तातडीने होणे अत्यावश्यक आहे. या बायपासच्या कामाची निविदा निघालेली आहे. या कामाचे आदेश देण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत लवकरच बैठक घेऊन या बायपासचे काम तातडीने सुरू करण्यात येईल असे आश्वासन माणगाव येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या आढावा बैठकीत खासदार सुनील तटकरे यांनी दिले.

माणगाव आणि इंदापूर बायपास लवकरात लवकर होणे ही काळाची गरज बनली आहे. यासाठी तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांनी लोकभावना लक्षात घेऊन काम सुरू करावे. हे काम लवकर पूर्ण करण्यासाठी विशिष्ट उद्देशाने काम करावे. हे सरकार लोकांसाठी काम करणारे आहे. तशी भूमिका अधिकार्यांनी घेऊन हा बायपास विशिष्ठ कालावधीत पूर्ण करण्यासाठी काम करावे. या कामात हयगय आणि दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही अशी तंबी खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

माणगाव आणि कळमजे येथील नवीन पुलांची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. ती लवकर करून या पुलावरून वाहतूक सुरू करावी. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी. नाणोरे, उतेखोल आणि भादाव या नगरपंचायत हद्दीतील गावांना सुलभ रहदारी करण्यासाठी ठिकठिकाणी सर्व्हिस रोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. या मार्गावर स्ट्रीट लाईट सुरू करावी. काळ नदी किनारी गणेश विसर्जन करण्यासाठी नव्याने घाट बांधण्यात यावे. जूने माणगाव ते ढालघर फाटा येथील अर्धवट अवस्थेत असलेल्या गटारांची कामे आणि महामार्गावरील साईट पट्टी पूर्ण करावीत. या सर्व कामांमध्ये हलगर्जीपणा केल्यास कडक कारवाई करण्यात येणार येईल. माणगावातील लोकांनी आपल्या दिरंगाईमुळे खूप सोसले आहे.आता त्यांची सहनशक्ती आणि सहनशीलता संपली आहे. त्यामुळे ही सर्व कामे जलदगतीने निकाली काढून ती पूर्ण करावी असे निर्देश खासदार सुनील तटकरे यांनी दिले.

या आढावा बैठकीत सुचविलेल्या सर्व कामांचे प्रस्ताव आणि अंदाज पत्रके एकत्रित तयार करुन मंत्रालयात संबंधित खात्याकडे आठ दिवसांत पाठवून द्यावीत. बायपास मार्गावरील ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून कामाच्या आदेशाची वाट न पाहता बायपास मार्गावरील काम तातडीने सुरू करावे. तसेच मोरबा रोड ते महामार्गाचे काम ताबडतोब सुरू करण्यात यावे. जेणेकरून वाहतूक कोंडीचा फटका सर्वसामान्यांना बसणार नाही. महामार्गावरील अतिक्रमणे काढून महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा. तहसील कार्यालयात सर्व सामान्य नागरिक यांच्यासह अपंग, विधवा, दिव्यांग यांची कामे प्राधान्याने करावी. अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे माणगाव येथील नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करुन हाल सोसावे लागत आहेत. या सर्व कामांत कुचराई केल्यास संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा खासदार सुनील तटकरे यांनी दिला.

या आढावा बैठकीला ॲड. राजीव साबळे, सुभाष केकाणे, स्नेहल जगताप, नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, आनंद यादव, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर प्रांताधिकारी, तहसीलदार, नगरसेवक, विविध खात्यांचे अधिकारी उपस्थित होते.




### पत्रकारांना निमंत्रण नाही

या आढावा बैठकीचे माणगाव शहरातील पत्रकारांना निमंत्रण दिले गेले नव्हते. या प्रकारामुळे पत्रकार संतप्त झाले होते. त्यामुळे सर्व पत्रकारांनी या आढावा बैठकीवर बहिष्कार टाकला होता. याबाबत खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, यांची दखल घेतली असून संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. यापुढे पत्रकारांना निमंत्रण दिले नाही तर कारवाई करण्यात येईल.

# जूनचा शेवटचा विकेंड हाऊसफुल्ल!



**माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये जूनच्या शेवटी पावसाने आपला जोर कायम ठेवल्याने व शनिवार, रविवार सुट्टी असल्याने मोठ्या संख्येने पर्यटकांनी माथेरानमध्ये गर्दी केली होती. पावसाळ्यात माथेरानमध्ये फिरण्याची मजा तर काही औरच असते हे जाणणाऱ्याचा यात मोठा सहभाग दिसून आला. यामुळे जूनचा शेवटचा विकेंड हाऊसफुल्ल झाला होता.

माथेरान पर्यटनस्थळी उन्हाळ्यात पर्यटकांची संख्या कमी होती,ती कसर जून महिन्यात पावसाळी पर्यटना मध्ये भरून निघाली असून शेवटच्या आठवड्यात पर्यटक मोठ्या प्रमाणावर माथेरान मध्ये दाखल झाले होते. जुनचा शेवटचा विकेंड देखील हाऊसफुल्ल झाला असल्याने येथील व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी मुसळधार पाऊस असतानाही माथेरान मधील प्रत्येक पॉईंटवर पर्यटकांचे घोळकेच्या घोळके दिसून आले.कोणी आपल्या मित्र-मैत्रिणींसह, तर कोणी आपल्या कुटुंबासोबत येथील पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटताना दिसले. यात येथील दाट धुक्याची चादर,हिरव्यागार निसर्गात पडणारा पाऊस आणि डोंगरावरून पडणाऱ्या धबधब्याचे पाणी ही सारी दृश्ये अनेक पर्यटक सेल्फीच्या माध्यमातून आपल्या कॅमेऱ्यात टिपताना दिसत होते.

शनिवारी आम्ही मित्रांबरोबर माथेरानला आलो,तेव्हा जोरदार पाऊस होता. शहरात येताना थोडी भीती होती, पण ज्या वेळेस आम्ही शहरात पोहोचलो तेव्हा भर पावसात पर्यटक धमाल मस्ती करताना तसेच स्थानिक रहिवासी त्यांना सेवा देत असल्याचे पाहून आम्हीही रमून गेलो.प्रत्येक पॉईंटवर पर्यटकांची गर्दी होती,त्यात आम्ही सहभागी व्हायचो.काही पॉईंटच्या टोकावर गेल्यावर दाट धुक्यामुळे पुढे काय आहे, हेपण कळत नव्हते. असे मुंबईच्या सिद्धेश पाटील यांनी सांगितले.

**महावितरण**

**वीज पुरवठा बंद निवेदन**

२२० के.व्ही. कांदळगांव सबस्टेशन येथे अत्यंत तातडीचे दुरूस्तीचे काम दिनांक : दि. ०१.०७.२०२५ रोजी करण्यात येणार आहे. त्यामुळे गोरेगांव विभागांतर्गत गोरेगाव उपविभागातील गोरेगाव शहर, लोणेरे व गोरेगाव ग्रामीण (खामगाव व आंबेत) फिडरवरील वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा दिनांक : दि. ०१.०७.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून ते दुपारी ०३.०० वाजेपर्यन्त बंद राहील. कामाच्या गरजेनुसार नियोजित वेळेत पुर्णत: किंवा अंशत: बदल होवू शकतो. तरी ग्राहकांनी कृपया याची नोंद घ्यावी व महावितरण कंपनीला सहकार्य करावे असे अवाहन करण्यात येत आहे.

**PRO No-206 कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., गोरेगांव विभाग**

**कुळगांव बदलापूर नगर परिषद**

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व),
कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल : coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट : http://kbmc.gov.in

**जाहीर ई-निविदा सूचना २०२५-२६**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत बदलापूर हद्दीमधील महिलांना ज्यूडो, कराटे, योगा विषयाचे प्रशिक्षण देणे करीता ई-निविदा शासनाच्या https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आली आहे. सदर ई-निविदा संच विक्री संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर ई - निविदा संच विक्री व स्विकृतिचा कालावधी दिनांक ०१/०७/२०२५. सकाळी १०.३० ते दिनांक ०७/०७/२०२५. दुपारी ३.०० वाजेपर्यत आहे. तसेच दिनांक ०९/०७/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता अथवा अन्य सोयीच्या दिवशी सदर ई - निविदा उघडण्यात येईल. प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक निवीदा स्विकारण्याचा अथवा कारणाशिवाय सर्व निविदा नाकारण्याचा तसेच नियम व अटी शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगांव बदलापुर नगरपरिषद यांनी राखुन ठेवला आहे.

दिनांक : ३०/०६/२०२५
जा.क्र./कुबनप/महिला व बालकल्याण विभाग/ /२०२५-२६

**सही/-**
मुख्याधिकारी,
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**प्रथम मुदतवाढ**

| अनु. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा क्र./प.म.पा./अ.वि./२६२१/ प्र.क्र.१६/१०६९/ २०२५ | पनवेल महानगरपालिका अग्निशमन/ आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता अत्याधुनीक साधन सामुग्री खरेदी करणेकामी. |

या ई-निविदे बाबतची विस्तृत माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/०६/२०२५ ते दि. ०७/०७/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०६/२०२५
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/ प्र.क्र.२९३/२९७/२०२५

**सही/-**
उप आयुक्त (I)
पनवेल महानगरपालिका

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे खानाव, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ३२/१ | ०-०४-८० | ०.९४ | सुनील भरत पाटील<br>सुमती रमेश पाटील<br>सुरेखा भरत पाटील<br>संदीप भरत पाटील<br>प्रियांका राहुल पाटील<br>मानसी देवेंद्र पाटील<br>रुद्रा राहुल पाटील<br>रेवा राहुल पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ३०/०६/२०२५.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : ९९३०३६९८६१

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **वाटपपत्र / करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | वाटपपत्र / करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटपपत्र / करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ता. उरण, जि. रायगड** | | | | | | | |
| १ | वडघर<br>संचिका क्र.६६१ | ३२/१०१ | ४/८<br>४/९B/ १०+११<br>४/१२ | ०-३-५<br>०-५३-९<br>०-७०-५ | ३००० चौ.मी. विभाजना नुसार २३०० चौ.मी. | नोड-करंजाडे येथील सेक्टर क्र. ४ मधील भूखंड क्र. ४२, क्षेत्र २२२६.१९ चौ.मी. | १) याकुबभाई असगरअली बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>२) मोईज हातीमभाई बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>३) शब्बीर हातीमभाई बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>४) मुर्तजा शब्बीर बलसारा<br>५) तसनीम हातीमभाई बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>६) अस्मा मुश्ताअली सोडावाला<br>७) मोहम्मद मन्सूर पनवेलवाला उर्फ बोहरी<br>८) मुक्रम मोहसीनभाई बलसारा<br>९) नाझनीन अजील कॉन्ट्रेक्टर उर्फ बोहरी<br>१०)आमीर अजीज कॉन्ट्रेक्टर उर्फ बोहरी | निरंक |
| | करंजाडे<br>संचिका क्र.६६१ | २४३अ | १११B/२<br>१०६/५<br>१०७/२<br>१०७/५<br>१०७/१०<br>११४/१ +२ | ०-०८-४<br>०-०२-५<br>०-०९-९<br>१-०२-८<br>०-०३-५<br>०-८६-४ | | | | |
| | एकूण क्षेत्र | | | **३-४१-४** | | | | |
| २ | वडघर<br>संचिका क्र.६६१ | ३२/१०१ | ४/८<br>४/९B/ १०+११<br>४/१२ | ०-३-५<br>०-५३-९<br>०-७०-५ | ३००० चौ.मी. विभाजना नुसार ७०० चौ.मी. | नोड-करंजाडे येथील सेक्टर क्र. ४ मधील भूखंड क्र. ४२A, क्षेत्र ६७७.७६ चौ.मी. | १) हुसेनीभाई असगरअली बोहरी (मयत) यांचे वारस<br>१/१)झेनब हुसेनीभाई बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>१/२)असगरअली हुसेनीभाई बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>१/३)अजीज हुसेनीभाई बोहरी उर्फ कॉन्ट्रेक्टर<br>१/४)फरीदा शब्बीर तारवाला<br>१/५)फेमीदा सुबेर रावत<br>१/६)बशीरा जोएब बदामी<br>१/७)रशीदा जुजर काचवाला | निरंक |
| | करंजाडे<br>संचिका क्र.६६१ | २४३अ | १११B/२<br>१०६/५<br>१०७/२<br>१०७/५<br>१०७/१०<br>११४/१ +२ | ०-०८-४<br>०-०२-५<br>०-०९-९<br>१-०२-८<br>०-०३-५<br>०-८६-४ | | | | |
| | एकूण क्षेत्र | | | **३-४१-४** | | | | |
| ३ | करळ | १४२/८७ | ११९/९<br>१३५/२<br>१३५/७ | ०-१०-७<br>०-०३-५<br>०-०१-५ | १५० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी येथील भूखंड क्र. ६८C, सेक्टर -५५, क्षेत्र १५० चौ.मी. | **कै. मंगळ्या हाल्या घरत (मयत) व कै. पांडुरंग उर्फ पांडु मंगळ्या घरत (मयत)** यांचे वारस<br>१) श्री. धनाजी सुकीर घरत<br>२) श्रीमती मंजुळा किसन ढवळे<br>३) श्रीमती प्रभावती बाळु पाटील<br>४) श्री. सुरेश पांडुरंग घरत<br>५) श्री. हेमंत पांडुरंग घरत | निरंक |
| ४ | रोडपाली २१ | ३जे/४ | ६५/३ | ०-११-४ | १५०० चौ.मी. पात्रता पैकी ९७८ चौ. मी. प्रस्तावित | रोडपाली येथे भूखंड क्र.९१, सेक्टर-१६E, क्षेत्र -९७८ चौ.मी. | **मूळ भूधारक**<br>**महादेव शामा ठाकूर**<br>**नारायण शंकर ठाकूर**<br>**सुदाम जोमा ठाकूर व इतर ३**<br>**तुकाराम बाळू ठाकूर**<br>यांच्या वतीने भूखंड दावा क्र. SCS २७७/२०११ मधील आदेशानूसार स्पे. दरखास्त क्र. ६२/२०१३ मधील दरखास्तदार सुरजित अलसिंघानी यांनी अँड भूषण म्हात्रे कोर्ट कमिशनर यांच्या नावे भूखंड वाटपाबाबत प्रस्तावित आहे. | मा. सहव्यवस्थापकीय संचालक ३ यांचेकडील अट क्र. ८ अनुसरुन मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार संचिकेमधील मा.न्यायालयाच्या वेगवेगळ्या आदेशाच्या अनुषंगाने विधी विभागाद्वारे खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.<br>The final judgement passed in SCS 557/2008 on 10/04/2013 shall not proceed the effect of The Judgement passed in SCS 277/2011 on 18/06/2011. Hence the compliance of the Consent Terms filed in SCS 277/2011 on the basis of Which the decree dated 18/06/2011 was passed, is required to be verified and the said order may be acted upon.<br>श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांनी दि. २८/०५/२०२५ रोजी सादर केलेल्या अर्ज/ना हरकत दाखलाच्या अनुषंगाने नमूद केल्यानुसार त्यांनी मा. न्यायालय, पनवेल येथे दाखल केलेल्या SCS ५५७/२००८ on १०/०४/२०१३ अनुसरुन दि. २६/०५/२०२५ रोजी श्री. सुरजित बी. अलसिंगानी यांचेमध्ये तडजोड झाली आहे. उक्त तडजोडीच्या अनुषंगाने श्री. पुरषोत्तम अग्रवाल यांनी संबधीत भूखंडाच्या बाबतीत SCS ५५७/२००८ तील आपले सर्व अधिकार श्री. सुरजित बो. अलसिगानी यांना देऊ केले आहेत.<br>तसेच, उक्त नमूद भूखंड दावा क्र. SCS २७७/२०११ अन्वये श्री. सुरजित वी. अलसिगानी यांचे नावे हस्तांतरण करण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही व घेणार नाही असे नमूद केले आहे.<br>विधी विभागाच्या उक्त नमुद अभिप्राय विचारात घेता नोड कळंबोली / रोडपाली येथील भूखंड क्र. ९१, सेक्टर-१६ई, क्षेत्र-९३६.०५८ चौ.मी. या भूखंड वाटपाबाबत स्पे. दरखास्त क्र. ६२/२०१३ मधील दरखास्तदार सुरजित अलसिंघानी यांनी **ॲड. भूषण म्हात्रे कोर्ट कमिशनर यांच्या नावे भूखंड वाटपाबाबत प्रस्तावित आहे.** |
| | | १२७ | १०५/० | ०-३३-६ | | | | |
| | | १२७ | ३५१/०पै. | ०-१७-७ | | | | |
| | | १२७ | ६०/० | ०-२७-४ | | | | |
| | | १२७+३ | ११६/० | ०-२९-३ | | | | |
| | | १६ | १९६/० | ०-२४-४ | | | | |
| | | १९ | १५२/२ | ०-१०-४ | | | | |
| | | ३४ब | १५६/४ | ०-०४-५ | | | | |
| | | १२७+३ | ३६३/३पै. | ०-०६-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा/वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
तळ मजला, सिडको भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/१४०/२०२५-२६**


## निवडक

### प्रजापती मंडळातर्फे वृक्षारोपण



**पनवेल :** प्रजापती समाज विकास मंडळ नोंदणीकृत यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल (करंजाडे छट्पूजा तलाव संकुल) येथे वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय सामाजिक संघटना एनजीओ. वृक्षारोपणादरम्यान, पिंपळ, कडुलिंब, वड इत्यादी ऑक्सिजन पुरवणाऱ्या वनस्पती लावण्यात आल्या. वृक्षारोपण कार्यक्रमात राष्ट्रीय अध्यक्ष सी.पी. प्रजापती, रोहित संजय कुंभार-अध्यक्ष (पनवेल महानगरपालिका क्षेत्र), भगवानदास प्रजापती सचिव-करंजाडे विभाग, लवकुमार प्रजापती-उपसचिव, राकेशकुमार प्रजापती-कार्यकारी सदस्य, सत्यनारायण शर्मा-छट्पूजा समिती अध्यक्ष-करंजाडे आदींनी सहभाग घेतला.

### वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम



**नवी मुंबई :** भाजपचे माजी नगरसेवक सुनील पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने नेरूळ तसेच दारावे गावमध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सेंटर फॉर साईट यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोफत औषधे व चष्म्यासहित अल्पदरात लेझर मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर त्याचबरोबर अल्पदरात उत्पन्नाचा दाखला वाटप आदी उपक्रम राबविण्यात आले.

### शासनाच्या योजनांचे मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई :** केंद्र व राज्य शासन योजनांचे मार्गदर्शन शिबिरचे आयोजन रविवारी वाशी येथे करण्यात आले होते.



या वेळी मोठ्या प्रमाणात प्रभागातील नागरिक उपस्थित होते. आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वात व जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप जनसंपर्क कार्यालय येथे हे शिबिर झाले. शिबिराचे मार्गदर्शक वसंत सुतार यांनी उपस्थितांना केंद्र व राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या अनेक कल्याणकारी योजनांची विस्तृत माहीती दिली. वाशीतील आमदार मंदा म्हात्रे यांच्या भाजपा जनसंपर्क कार्यालयातुन चालू करण्यात येणार असल्याचे भाजपचे वाशी विभाग अध्यक्ष विकास सोरटे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास अभिजित पेडणेकर, कल्पना छत्रे आदी उपस्थित होते.

### गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत



**पनवेल :** गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्था गुळसुंदे या संस्थेच्या माध्यमातुन समाजातील आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकासांसाठी काम केले जाते, यामध्ये विविध आरोग्यविषयक शिबिरे, गरजु रुग्णांसाठी व विद्यार्थांसाठी आर्थिक मदत तसेच आदीवासी व शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. तुंगारतन विभाग विद्यामंदिर गुळसुंदे विद्यालयातील नववी व दहावीच्या गरजू विद्यार्थांना वरील संस्थेच्या माध्यमातुन पुस्तके वाटण्याचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. संस्थेचे संस्थापक सदस्य महेश गाडगीळ, संस्थेचे मुख्याध्यापक कांबळे, सर्व शिक्षकवर्ग व सामाजिक कार्यकर्ते आर.डी. पाटील या समारंभाला उपस्थित होते.

# घरफोडी करणारा सराईत अटकेत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



खारघर शहरातील रुद्र रेजन्सी सेक्टर ३५ बिल्डर राजेश कुमार बेरिया यांच्या बांधकाम सुरू असलेल्या साईट वरून बसविण्याकरिता आणलेले नळ कोणीतरी अज्ञात व्यक्तीने रात्रीच्या वेळी चोरी करून नेल्याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. खारघर पोलीस या घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध घेत असताना घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पडताळणी करून आरोपी हा रेकॉर्डवरील असल्याचे पोलिसांना निष्पन्न झाले.

रेकॉर्डवरील आरोपी मोबाईल फोन वापरत नसल्याने त्यांचा कोणताही ठाव ठिकाण नव्हता सदर आरोपी याचा पूर्व इतिहास पडताळून त्यामध्ये त्याच्या यापूर्वी वापरलेल्या मोबाईल नंबर पैकी एक नंबर सुरू असल्याचे पोलिसांना निष्पन्न झाले व त्यावरून आरोपी अब्दुल सईद बकरीदि खान (वय ३८) तळोजा फेज २ परिसरातून ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्याने खारघर पोलीस ठाणे हद्दीतील चार ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली.

आरोपीवर तळोजा, पनवेल, सायन, बेलापूर, खारघर, नेरूळ, कोपरखैरणे, रबाळे पोलीस ठाण्यात दाखल झालेले गुन्हे उघडकीस आले. आरोपीकडून पोलीस कोठडी दरम्यान वरील गुन्ह्यांमधील वेगवेगळ्या प्रकारचे नळ, केबल, व इतर बांधकाम साहित्य असा एकूण दोन लाख ३६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ही कामगिरी खारघर पोलीस ठाण्याचे गुन्हे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनी प्रदीप आव्हाड, फिरोज आगा, पोलीस हवालदार प्रशांत जाधव, राहुल ढावरे, सुरज वायदांडे यांच्या पथकाने केली आहे.

## अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे व ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत घर नं ३९०, बोनकोडे गाव, तसेच घर क्र २८०, खैरणे गाव, फ्रेएन्ड्स बेकरी समोर बांधकामावर निष्कासनाची तोडक कार्यवाही करण्यात आली. ऐरोली येथे घर क्र- एफ-२०३, से-०३, ऐरोली नवी मुंबई यांच्या अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले. रो-हाऊस नं-०४, जी व्हिला,से-०२, ऐरोली येथील अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले.

## सायन-पनवेल महामार्ग आणि रेल्वेस्थानकांची सखोल स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबईकर नागरिक स्वच्छतेविषयी जागरूक असल्यामुळे नवी मुंबईचे स्वच्छतेमधील राष्ट्रीय मानांकन नेहमीच उंचावत राहिले आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात रविवारी डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा अलिबाग यांचे तीन हजार ५०० हून अधिक श्रीसदस्य तसेच नागरिक एकत्र येऊन सायन पनवेल महामार्ग व रेल्वे स्टेशन्सच्या सखोल स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले ही समाधान व आनंद देणारी बाब असल्याचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिका आणि डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायन पनवेल महामार्ग तसेच बेलापूर, नेरूळ, जुईनगर, सानपाडा, वाशी या ५ रेल्वे स्टेशन्सची सखोल स्वच्छता मोहीम आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यामध्ये २२ टन कचरा संकलित करण्यात आला. यामध्ये प्लास्टिकचे तुकडे, रॅपर्स, एकल वापर प्लास्टिक, बॉटल्स, कागद, कपडा अशा प्रकारचा कचरा तसेच अस्ताव्यस्त वाढलेले गवत, वेली यांचाही हरित कचरा संकलित करण्यात आला.

उरण फाटा येथून आयुक्त महोदयांच्या उपस्थितीत स्वच्छतेची सामुहिक शपथ घेऊन प्रारंभ झालेल्या या स्वच्छता मोहीमेचे विभागनिहाय नियोजन करण्यात आले होते. सकाळी ७.३० वाजल्यापासून सुरू झालेल्या या सायन-पनवेल महामार्ग स्वच्छता मोहीमेचे व्यवस्थित नियोजन करण्यात आले होते. बेलापूरपासून नमुंमपा हद्द ते कोकण भवन सर्कल, कोकण भवन सर्कल ते उरणफाटा ब्रीज सर्कल, उरणफाटा सर्कल ते डी.वाय.पाटील कॉलेज सर्कल, डी.वाय.पाटील कॉलेज सर्कल ते शिरवणे अंडरपास ब्रीज, शिरवणे अंडरपास ब्रीज ते जुईनगर फ्लायओव्हर ब्रीज, जुईनगर फ्लायओव्हर ब्रीज ते सानपाडा ब्रीज, सानपाडा दत्तमंदीर हायवे ते सानपाडा रेल्वे स्टेशन सर्कल, सानपाडा रेल्वे स्टेशन सर्कल ते वाशी सर्कल ब्रीज, वाशी सर्कल ब्रीज ते वाशीगाव बसस्टॉप, वाशी गाव बस स्टॉप ते वाशी टोलनाका अशाप्रकारे स्वतंत्र गट करून डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्रीसदस्य नागरिक यांना क्षेत्र वाटप करून देण्यात आले होते. त्याचप्रमाणे बेलापूर, नेरूळ, जुईनगर, सानपाडा, वाशी या ५ रेल्वे स्टेशन्स परिसर सफाईसाठीही गटनिहाय नियोजन करण्यात आले होते.

## सीवूड्समधील बंद असलेले पाळणाघर लवकरच सुरू होणार

■ **वनमंत्री गणेश नाईक यांचे प्रशासनाला निर्देश**

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



सीवुड्समधील नवी मुंबई महापालिकेच्या उदासीनतेमुळे २०२१ पासून बंद असलेले पाळणाघर आता पुन्हा सुरू होणार आहे.

माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे उपस्थित केलेल्या प्रश्नावर नामदार गणेश नाईक यांनी नवी मुंबई मनपा प्रशासनाला सिवूड्स येथील पाळणाघर तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. वाशी येथील जनता दरबारात माजी नगरसेवक विशाल डोळस यांनी मंत्री गणेश नाईक यांना निवेदन दिले. निवेदनात महापालिका प्रशासनावर आरोप करताना डोळस यांनी सांगितले की, पाळणाघराची इमारत महापालिकेने लाखो रुपये खर्च करून बांधली असूनही, समाज विकास विभागाच्या निष्क्रियतेमुळे ती सध्या धूळ खात आहे. तसेच, एसओपी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर) नसतानाही महापालिका प्रशासन आणि समाजकल्याण विभागाने नागरिकांची दिशाभूल करत पाळणाघर चालवण्यासाठी आयसिडीएस विभागाला ही इमारत केवळ १२,००० मासिक भाड्याने देण्याचा प्रस्ताव तयार केला होता, परंतु विभागाच्या प्रमुखांनी स्पष्ट केले आहे की, एसओपी नसल्यामुळे या ठिकाणी केवळ अंगणवाडी चालवली जाईल यावर विशाल डोळस यांनी सांगितले की, प्रशासन नागरिकांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रयत्न करत आहे.

यावर डोळस यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना मंत्री गणेश नाईक यांनी समाज विकास विभागाचे अधिकारी किसनराव पालांडे आणि अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांना पाळणाघर तातडीने सुरू करण्याचे आदेश दिले असून आता कोणतेही टाळाटाळ खपवून घेतले जाणार नसल्याचे ना. नाईक यांनी स्पष्ट केले.

## नवी मुंबईतील २,१११ इमारतींना भोगवटा प्रमाणपत्रच नाही

**नवी मुंबई : बातमीदार**

उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. २४/२०१९ व रिट याचिका क्र.१३८६४/२०१८ मध्ये पारीत केलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेल्या परंतू भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करता वापर सुरू केलेल्या इमारतींची यादी नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in यावर तसेच महानगरपालिकेची सर्व आठ विभाग कार्यालये याठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यादीत नमूद केलेल्या २१११ इमारतीमधील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेल्या सर्व इमारतींना वापर सुरू करण्यापूर्वी भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

संबंधितांनी भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव नगररचना विभागाकडे सादर करुन भोगवटा प्रमाणपत्र घ्यावे. अन्यथा आपणाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार पदनिर्देशीत अधिकारी यांचेमार्फत नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी विषयांकित याचिकेत २५ ऑक्टोबर २०२४ रोजी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेल्या परंतू भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरू असलेल्या इमारतींची यादी सादर करणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्यास अनुसरून सर्व विभाग कार्यालयांनी सर्वेक्षण करून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेल्या, परंतु भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरू असलेल्या इमारतींचा अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या अभिलेखातील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेतलेल्या परंतू भोगवटा प्रमाणपत्र न घेता वापर सुरू असलेल्या इमारतींची माहिती प्रसिध्द करण्यात येत आहे.

या यादीत नमूद इमारती / सोसायटी यांनी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेऊन, भोगवटा प्रमाणपत्र न घेता, वापर सुरू केला असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

## विशेष मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

नमुंमपा ईटीसी अपंग शिक्षण प्रशिक्षण केंद्रामध्ये वेगवेगळ्या वयोगटातील मतिमंद, कर्णबधीर, स्वमग्न, अंध, अध्ययन अक्षम आणि बहुविकलांग मुले शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधांचा लाभ घेत असतात. ईटीसी केंद्रामार्फत या विशेष मुलांसाठी शिक्षण व विविध थेअरपीसोबत इतरही अनेक उपक्रम राबवले जातात. या नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विशेष मुलांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेतील सर्व शाळा अंगणवाडी यांमध्ये शिक्षण घेणा-या सर्व मुलांचे आरोग्य तपासणी करण्यात येत असते. याचाच एक भाग म्हणून नमुंमपा ईटीसी केंद्रातील विशेष मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये दैनंदिन आरोग्य, हवामानानुसार होणारे आजार या अनुषंगाने मुलांची तपासणी करण्यात आली.

या तपासणीकरिता डॉ. अशोक चव्हाण, डॉ. सुस्मिता व्हटकर, डॉ. रणजीत शिर्के, डॉ. भाग्यश्री भोकरे, डॉ. तेजस्विनी जाधव, डॉ. प्रतिभा मुंडे, डॉ. विजय पाटील, डॉ. निखील केसरे या डॉक्टरांसह इतर आरोग्य समुहाने विशेष मुलांची तपासणी केली व गरजेनुसार पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन केले.

या आरोग्य शिबीरामध्ये कर्णबधिर विभागातील ११४, मतिमंद विभागातील १०८, बहुविकलांग विभागातील ११ आणि अंध विभागातील १९ तसेच ओपीडी विभागातील २५ अशा एकूण २७७ विशेष मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

### क्लिक...क्लिक...!



**मुरुड :** परिसरात बळीराजा शेतीच्या कामामध्ये व्यस्त असून भाताचे राबही पावसात चांगले वर आले आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

## उरण परिसरात १३५ रोपांची लागवड

**उरण : वार्ताहर, बातमीदार**



पर्यावरण संवर्धन व शाश्वत हरित उपक्रमांच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, फुंडे यांनी केमिशिया फार्मास्युटिकल, तळोजा यांच्या सहकार्याने वृक्षारोपण मोहीम राबवली. ही मोहीम प्राणीशास्त्र आणि रसायनशास्त्र विभाग यांच्यामार्फत समझोता करार अंतर्गत राबविण्यात आली.

या अभियानात सुमारे १३५ वृक्षांचे रोपण करण्यात आले. मधुमालती, करंज, काजू, अर्जुन, बदाम, बहावा, फणस, तामण, वड, आणि जांम यांसारख्या लोकोपयोगी व पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. हे सर्व रोपे केमिशिया फार्मास्युटिकल, तळोजा यांनी सीएसआर उपक्रमांतर्गत भेट केली होती.

वृक्षारोपण स्थळांमध्ये तु. ह. वाजेकर विद्यालय (फुंडे), टाकीगाव, बापदेव मंदिराजवळील वनक्षेत्र आणि इतर नैसर्गिक परिसरांचा समावेश होता. ह्या साठी केमिशिया फार्मास्युटिकलचे संचालक दीपक पवार आणि संतोष शिंदे उपस्थितीत होते. तसेच वीर वाजेकर महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर उपस्थितांचे मार्गदर्शन करताना वनसंवर्धन, जैवविविधतेचे रक्षण आणि तरुणांनी पर्यावरणासाठी जबाबदारीने काम करणे यावर भर दिला.

तु. ह. वाजेकर विद्यालयाचे प्राचार्य साळुंखे सर, थोरात मॅडम, बाबर मॅडम, पाटील सर, सदानंद म्हात्रे सर, डॉ. अनिल पळवे, डॉ. राहुल पाटील,डॉ. जी. सी. वधवा, राम गोसावी व डॉ. राजकुमार कांबळे, एनएसएस स्वयंसेवक व एनएसएसकॅडेट्स, डॉ. संदीप घोडके, गजानन चव्हाण, फोन सामाजिक संस्थेचे निकेतन ठाकूर, केमिशिया फार्मास्युटिकलचे सुमारे १५ कर्मचारी व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी श्री पंढरीनाथ घरत, आंबवकर, सौरव सकपाळ या उपक्रमात सक्रीय सहभागी झाले.


## निवडक



### विघवली हायस्कूलमध्ये गुणगौरव

**माणगाव :** तालुक्यातील विघवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या विघवली हायस्कूलमधील शैक्षणिक वर्ष सन २०२४–२५ या वर्षातील दहावी परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी संस्था पदाधिकारी व सदस्य यांच्या उपस्थितीत व हस्ते विघवली हायस्कूलमध्ये उत्साहात झाला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष महादेवराव बक्कम, संस्थेचे कार्यवाह बा. द. बेंडखळे गुरुजी, सहकार्यवाह दिलीप उभारे, स्कूल कमिटी चेअरमन नामदेव शिंदे, संस्था सदस्य, मुख्याध्यापक पांडुरंग उभारे तसेच अ. वि.जंगम सर, शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक कृष्णा पानवकर यांनी तर मुख्याध्यापक पांडुरंग उभारे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

### रोहा येथे महारुद्र अनुष्ठान



**रोहे :** ब्राह्मण मंडळ रोहातर्फे संपूर्ण गावाच्या कल्याणासाठी श्री ओंकारेश्वर मंदिर रोहा येथे महारुद्र अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी श्री धावीर नाम सप्ताहाच्या आधी लघुरुद्र अनुष्ठान करण्यात येते. यावर्षी नाम सप्ताहाचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने सर्व ब्रह्मवृंदांच्या विशेष पुढाकारातून महारुद्र अनुष्ठान झाले. अनुष्ठान यशस्वी होण्यासाठी वे.मु. मंदार पेंडसे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली विवेक बापट गुरुजी, सर्व ब्रह्मवृंद, सप्ताह प्रमुख महेश पेंडसे, ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते, यजमान प्रतिक पाटणकर आदींसह सर्व कार्यकारिणी सदस्यांनी विशेष प्रयत्न केले.

### राजर्षी शाहू महाराज जयंती महोत्सव

**पाली :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती



महोत्सव बौद्धजन पंचायत समिती मध्यवर्ती कार्यालय यांच्या विद्यमाने कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत यांच्या अध्यक्षते खाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह परेल मुंबई १२ येथे मोठ्या उत्साहात झाला. या वेळी लक्ष्मण भगत, चिटणीस विठ्ठल जाधव, सरचिटणीस राजेश घाडगे, चिटणीस अनिरुद्ध जाधव, उप कार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे, शिक्षण समिती अध्यक्ष राजेश पवार, निवडणूक मंडळाचे अध्यक्ष मिलिंद जाधव, सचिव संजय मोहिते, कार्यालय सेवक प्रदीप तांबे, साहित्य क्रीडा समिती अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास गमरे, निवडणूक मंडळाचे सदस्य अशोक कदम आदी उपस्थित होते.

### रोहे येथील नागेश शिंदे सन्मानित

**रोहा :** भुवनेश्वर येथील नागेश नंदकुमार शिंदे यांना दिल्ली येथे वर्ल्ड कल्चर अँड एन्व्हायरमेंट प्रोटेक्शन कमिशन यांचे तर्फे मानव संसाधन, प्रशासन व्यवस्थापन व सामाजिक बांधिलकी क्षेत्रामध्ये मानद डॉक्टररेट पदवी प्रदान करून सैन्य दलातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी, सिनेसृष्टीतील व अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. नागेश नंदकुमार शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करताना वरसे सरपंच रामाशेठ म्हात्रे, आगरी समाज अध्यक्ष हरिश्चंद्र मोरे, पत्रकार महादेव सरसंबे, माजी ग्रामपंचायत सदस्य राकेश गुरव, गणेश शिवलकर, अशोक निकम, अप्पा मोरे, रमेश म्हात्रे, जितेंद्र पडवळ, प्रा. विपुल मशाल आदी उपस्थित होते.



# वावंढळचा पूल धोकादायक

## वापर न करण्याचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

मूळ वावंढळ गाव आणि कोयना प्रकल्पग्रस्त वसाहत यांना जोडणारा पुल धोकादायक स्थितीत असल्याचे रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाने जाहीर केले असून या पुलाचा वापर करू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

कोयना प्रकल्पग्रस्त वसाहत या गावा शेजारी शिवकालीन तलावा जवळ नाल्यावर जुना अरुंद व कमी उंचीचा पुल असून तो धोकादायक अवस्थेत असल्याचे पत्र, पत्रकार आणि माजी सरपंच अर्जुन कदम यांनी रायगड जिल्हा परिषद यांच्या बांधकाम विभागास कळविले होते, रायगड जिल्हा परिषदेच्या खालापूर येथील बांधकाम विभागाच्या अभियंता यांना प्रत्यक्ष पुलाची वस्तुस्थिती दाखविली होती, हा पुल शिवकालीन तलावा जवळ असून मूळ वावंढळ गाव व कोयना प्रकल्पग्रस्त वसाहत यांना जोडणारा प्रमुख मार्ग आहे,याच पुलावरून प्राथमिक शाळा वावंढळ, ग्राम पंचायत कार्यालय, पिण्याच्या पाण्याची विहीर असून कोयना प्रकल्पग्रस्त ग्रामस्थ यांची सर्व शेत जमिनीकडे जाण्याचा मार्ग आहे, याच पुलाच्या पलिकडील भागात नागरी



वसाहत उभी राहत असून त्यांनाही याच पुलाचा वापर करावा लागत आहे. तर गुगल मॅप वर हाच रस्ता दिसत असल्याने अनेकजण या मार्गाचा वापर करतात.

हा पुल उंचीने कमी आहे. पावसाळ्यात पुलाखालून पाणी जाण्यासाठी एकच गाळा असल्याने व डोंगर भागातून, परिसरातील शेतातून येणारे पाणी गाळा अरुंद असल्याने त्वरीत पाण्याचा निचरा होत नाही, त्यामुळे पाणी पुलावरून व पुला जवळील घरांच्या आवारात शिरत असल्याने धोकादायक स्थिती निर्माण होते.

**सा.बां. विभागातर्फे फलक**

अरुंद पुल असल्याने मोठ्या गाड्या जात नाही. सद्या पुलाची वाईट अवस्था झाली असून या पुलाचा वापर करू नये अशा संदर्भाचा फलक कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग रायगड जिल्हा परिषद यांनी लावला आहे तसेच पुलावरून पाणी जात असल्यास व जड वाहने घेऊन जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांचा हिरमोड

**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळी पर्यटनासाठी लोणावळा आणि खंडाळ्याचा विचार करत असाल तर थांबा, त्याचे करणही तसेच आहे मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवर शनिवारी सकाळ पासूनच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली असून पुणे लेनवर अमृतांजन ब्रिजपासून खोपोली एक्झिट अशा पाच ते सहा किमीपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

सद्या रायगड जिल्हात मुसळधार पाऊस पडत असून नदी, नाले, ओढे, धबधबे, तलाव ओसंडून वाहत असून याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक येत असतात. थंड हवेचे ठिकाण असलेल्या लोणावळा आणि खंडाळा येथे शनिवार आणि रविवारी पर्यटक हे मुबंई आणी पुणे येथून मोठ्या प्रमाणात पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी येत असतात. त्यातच आज सकाळपासून मुंबई–पुणे एक्स्प्रेस वेवरील पुणे लेनवर अमृताजन ब्रिजपासून खोपोली एक्झिटपर्यंत अश एकूण पाच ते सहा किमी पर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या,

मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने काही वाहने ही मुंबई–पुणे जुन्या महामार्गाने बोरघाटातून लोणावळाकडे जात असल्याने बोरघाटातही सकाळपासून प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

दरम्यान, मिसिंग लिंकचे काम लवकरात लवकर पूर्ण करून वाहतूकिसाठी एक्सप्रेस वे चालू करावा, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे.



# वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

## ■ रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचा उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका मेडिकल असोसिएशनतर्फे शनिवारी फलटण येथे पंढरपूर वारीतील वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात आळंदीहून संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीसोबत सुमारे १३० किमीचा पायी प्रवास करून आलेल्या भाविक वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या शिबिराचे नेतृत्व आरटीएमएचे अध्यक्ष डॉ. मुकेश सिंग, डॉ. अमित पाटील आणि डॉ. प्रथमेश बुधे यांनी केले. या वेळी डॉ. रुपेश होडबे , डॉ. संकेत म्हात्रे, डॉ. अभिजित जोशी आणि डॉ. अतुल पाटील आदींनी वैद्यकीय सेवा दिली. औषधांचे वाटपही करण्यात आले.

उपक्रमाबद्दल एकनाथ तोडकरी, जय हनुमान भजनी मंडळ बामणी, तालुका व जिल्हा धाराशिव, वारकरी संप्रदाय यांच्यातर्फे सर्व डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.



# अमली पदार्थविरोधी दिनानिमित्त खालापूर पोलिसांनी दिल्या शाळांना भेटी



**चौक : प्रतिनिधी**

अमली पदार्थविरोधी दिनाच्या निमित्ताने खालापूर पोलीस यांनी खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या शाळांना भेटी देऊन जनजागृती करण्यासाठी शपथ दिली.

आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त खालापूर पोलीस ठाणे हद्दीतील श्री. छत्रपती विद्यालय व ज्युनियर कॉलेज वावोशी, सरनोबत नेताजी पालकर हायस्कूल चौक या शाळांना भेट देऊन विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला, अमली पदार्थ मनुष्य जीवनात किती घातक आहे याचे मार्गदर्शन करून काही उदाहरण सांगण्यात आली. या वेळी विद्यार्थी याचे सोबत परिसंवादाचे मार्गदर्शन केले करण्यात आले. अमली पदार्थ म्हणजे काय? अमली पदार्थ कोणकोणते असतात. अमली पदार्थ व्यसनांची लक्षणे कोणती, अंमली पदार्थ उपाय योजना, विद्यार्थी यांना सल्ला

याबाबत मार्गदर्शन करण्यात आले असून सरनोबत नेताजी पालकर हायस्कूल येथून चौक बाजारपेठेमधून रॅली काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थी यांना अंमली पदार्थ सेवन न करण्याबाबत शपथ घेण्यात आलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, सपोनि. औटी, सपो उप निरीक्षक गबाले, पोह. पाटील, पोह. खंडागळे, मपोह. पवार, पोशि. पाटील, पोशि. पाटील, पोशि. चौधरी, मपोशि. पापळ, मपोशि. राठोड उपस्थित होते.

# दहिवली गाव परिसर विचार मंचतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद क्षेत्रातील दहिवली विभागातील दहिवली गाव परिसर विचार मंचने विद्यार्थी गुण गौरवाचे आयोजन केले होते. या वेळी १२० गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

दहिवली येथील श्री विठ्ठल मंदिराच्या सभागृहात विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. थोर पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन कोकण ज्ञानपीठाचे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान आणि कर्जत एज्युकेशन सोसायटी इंग्रजी माध्यम शाळेच्या मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी यांच्या हस्ते करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी नगरसेवक संकेत भासे, विचार मंचचे अध्यक्ष सुनील जाधव, विकास चित्ते आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते प्रशास्तीपत्र, गौरव चिन्ह आणि पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. राजेश लाड, संकेत भासे यांनी सुद्धा आपले विचार मांडले. सूत्रसंचालन अतुल पवार तर आभार प्रदर्शन भरत



बामणे यांनी केले.

या वेळी मल्हारी माने, जयप्रकाश जाधव, सिद्धेश दांडेकर, दिपंकार सालये, दिलीप बोराडे, संजय मोहिते, अशोक पाटील, नंदकुमार गुरव, कुणाल बर्वे, अतुल पवार, जितेश पवार, सागर सुर्वे , रवी खराडे, अशोक कारुळकर, रमेश भागवत, विजय कडू, मानसी कदम, मानसी चिखलकर, लता कुलकर्णी, पुनम शिर्के, पराग दातार, सुदेश देवघरे, रमेश पवार, संजय मोहिते, प्रसाद डेरवणकर आदी उपस्थित होते.

# संचिता मगर अध्यक्षपदी

**धाटाव : प्रतिनिधी**

वाशी ग्रामपंचायतीने आदिशक्ती अभियान समिती स्थापन केली असून, या समितीच्या अध्यक्षपदी संचिता मगर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जागृती कार्यक्रमांतर्गत कायदे, योजना व त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा व सुविधा याचाबत प्रबोधन करण्यात येणार आहे.



नुकतीच माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. त्यातच महिला सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकारने आदिशक्ती अभियान ही योजना ग्रामपंचायत स्तरावर सुरू केली आहे. या अभियानांतर्गत महिला विकास विषयक कार्य म्हणजेच बालविवाह रोखणे, हुंडा पद्धती बंद करणे, महिला संरक्षण, गावातील एकल महिला, विधवा, परित्यक्ता व निराधार महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. महिला बचत गटांची निर्मिती व सक्षमीकरणासाठी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मदतीने कौशल्य आयटी विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# कोर्लई येथे विद्यार्थिनींना ५३ सायकलींचे मोफत वाटप



**मुरुड : प्रतिनिधी**

वरदाई चॅरिटेबल ट्रस्टतर्फे खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री अदिती तटकरे माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून समाजातील गरीब शालेय विद्यार्थिनींसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे माउंट कार्मेल हायस्कूल कोर्लई येथील ५३ शालेय विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप करण्यात आले.

या वेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन, अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे उपाध्यक्ष स्मिता खेडेकर, मुरूड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, भोईघर ग्रामपंचायत सरपंच हर्षल महाडिक, मुरुड तालुका कृषी उत्पन्न बाजार शमीचे संचालक अजित कासार, माजी सभापती बाबू नागवेकर, नाना गुरव, वासंती उमरोटकर, भरत म्हात्रे, कोर्लई हायस्कूलचे चेअरमन फादर बोनाव्हेंचर नुनीस, मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी, माजी सभापती आशिका ठाकूर, संजय महाडिक, दिनेश बापलेकर, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सचिन पाटील आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात अजित कासार, बाबू नागावकर, स्मिता खेडेकर, वासंती उमरोटकर आदी मान्यवर यांनी आपले विचार व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार योगेंद्र गोयजी यांनी व्यक्त केले.

# एकजुट कामगार संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी रामचंद्र पवार

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष प्रणित राष्ट्रीय एकजुट कामगार संघटनेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी रामचंद्र (रामभाऊ) पवार यांची नुकतीच संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस बलबीर नेगी यांनी नियुक्ती केली.

संपूर्ण देशात भारतीय जनता प्रणित राष्ट्रीय एकजुट कामगार संघटना कार्यरत आहे. आमदार सुधाकर देशमुख यांच्या मार्गदर्शना खाली संघटनेचे काम अविरत पणे सुरु आहे. कामगारांच्या न्याय हक्कासाठी सदर संघटना सदैव तत्पर आहे.

माजी मंत्री तथा भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचे विश्वासू सहकारी तसेच संपूर्ण रायगड जिल्ह्यात कामगारां साठी झटणारे, कामगारांना न्याय देण्यासाठी धडपड करणारे, माथाडी संघटनेच्या माध्यमातून विविध कंपन्यामध्ये कामगारांसाठी लढा उभारणारे कामगार नेते म्हणून रामचंद्र पवार यांचे नाव अग्रेसर आहे.

पवार यांच्या कामाची दखल घेऊन राष्ट्रीय एकजुट कामगार संघटनेचे राष्ट्रीय सरचिटणीस बलबीर नेगी यांनी महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड केली. त्यांची निवड होताच खोपोली शहरातील कार्यकर्त्यांनी आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला.



# बुमराहच्या जागी कुणाला संधी?

## दुसऱ्या कसोटीसाठी टीम इंडियात काही नावे चर्चेत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना जुलैपासून बर्मिंगहॅमच्या एजबॅस्टन मैदानावर खेळवला जाणार आहे. मालिकेत ०-१ने पिछाडीवर असलेल्या भारतीय संघासाठी चिंतेची बाब म्हणजे या सामन्यात जसप्रीत बुमराह खेळण्याची शक्यता नाही. त्यामुळे त्याच्या जागी कुणाला संधी मिळणार हे पाहणे महत्त्वाची आहे.

जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज अशी जसप्रीत बुमराहची ओळख आहे, मात्र इंग्लंड दौऱ्यातील पाच कसोटी सामन्यांपैकी केवळ तीन सामन्यातच तो खेळणार असल्याचे भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी स्पष्ट केले आहे. त्यापैकी एक सामना तो खेळला आहे. त्यामुळे आता तो केवळ दोनच सामन्यांमध्ये खेळताना दिसेल. भारतीय संघाकडे त्याच्या बदलीसाठी अत्यंत मर्यादित पर्याय उपलब्ध आहेत.

आता भारतीय संघ व्यवस्थापनाला आकाशदीप, अर्शदीप सिंग आणि कुलदीप यादव यांच्यापैकी एका खेळाडूची निवड करावी लागेल. नितीशकुमारचेही नाव चर्चेत आहे. मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा आणि शार्दुल ठाकूर यांनी लीड्स कसोटीत निराशाजनक कामगिरी केली, मात्र त्यांना संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय घाईचा ठरू शकतो, असे काहींचे म्हणणे आहे. सध्या भारतीय संघ स्थित्यंतरातून जात असून भविष्याची गोलंदाजीची फळी तयार करणे हे संघाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

इंग्लंड दौऱ्यातील पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने फलंदाजीत फर्स्ट क्लास शो दाखवला. पाच शतकांसह आतापर्यंत कोणत्याही संघाला न जमलेला पराक्रम करून दाखवत टीम इंडियाने लीड्सच्या हेडिंग्ले मैदानात इतिहास रचला, पण या ऐतिहासिक कामगिरीनंतरही जसप्रीत बुमराह वळगता इतर गोलंदाज कमी पडल्याने शुबमन गिलच्या कॅप्टन्सीत टीम इंडियाची सुरुवात पराभवाने झाली. मालिकेत ०-१ अशा पिछाडीवर असलेला भारतीय संघ बर्मिंगहॅमचे मैदान मारून यजमानांशी बरोबरी करण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल.

## केशव महाराजच्या कसोटीत दोनशे विकेट्स



**बुलवायो : वृत्तसंस्था**

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन ठरलेला दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या झिम्बाब्वेविरूद्ध कसोटी सामना खेळत आहे. या सामन्यात भारतीय वंशाचा खेळाडू केशव महाराज संघाचे नेतृत्व करत आहे. संघाचे नेतृत्व करताना या खेळाडूने अशी कामगिरी केली आहे, जी दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी इतिहासात यापूर्वी कधीही पहायला मिळाली नाही.

दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४१८ धावा करत डाव घोषित केला, तर झिम्बाब्वे दुसऱ्या डावात २५१ धावांवर सर्वबाद झाला, ज्यामध्ये कर्णधार केशव महाराजने तीन विकेट्स घेतल्या. महाराजने दोन विकेट्स घेत एक अनोखा विक्रम आपल्या नावे केला आहे.

३५ वर्षीय केशव महाराज हा दक्षिण आफ्रिकेकडून कसोटीत दोनशे विकेट्स घेणारा पहिला फिरकीपटू ठरला आहे. त्याने झिम्बाब्वेचा कर्णधार क्रेग एर्विनला बाद करून ही विशेष कामगिरी केली.

दोनशे कसोटी विकेट्ससह त्याने एक नवा विक्रम केला. या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाच्या नावावर आता ५९ कसोटी सामन्यात २०२ विकेट्स आहेत. त्याने ११ वेळा एका डावात पाच विकेट घेण्याचा पराक्रम केला आहे आणि एकदा सामन्यात १० विकेट्सही घेतल्या आहेत.

## ब्रायन बेनेट 'काँकशन'मुळे मैदानाबाहेर!



**बुलवायो : वृत्तसंस्था**

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ स्पर्धेची नवी साखळी सुरू झाली आहे. या नव्या साखळीत आयसीसीने लागू केलेल्या नव्या नियमांची अंमलबजावणी केली जाणार आहे, ज्यात काँकशन सब नियमाचादेखील समावेश आहे. पहिल्या कसोटीत झिम्बाब्वेचा फलंदाज ब्रायन बेनेटला डोक्याला चेंडू लागल्यामुळे मैदान सोडावे लागले आहे.

बुलावायोमध्ये सुरू असलेल्या पहिल्या कसोटीत पहिला दिवस दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी गाजवला. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी यजमान दक्षिण आफ्रिकेला फलंदाजीला येण्याची संधी मिळाली. झिम्बाब्वेकडून टी कायटानो आणि ब्रायन बेनेटची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानात आली. झिम्बाब्वेला पहिल्याच षटकात मोठा धक्का बसला. सलामीवीर फलंदाज कायटानो स्वस्तात माघारी परतला. त्यानंतर निक वेल्चही बाद होऊन माघारी परतला. अवघ्या २३ धावांवर दक्षिण आफ्रिकेचे दोन फलंदाज माघारी परतले होते.

दोन प्रमुख फलंदाज बाद झाल्यानंतर झिम्बाब्वेला सहाव्या षटकात मोठा धक्का बसला. दक्षिण आफ्रिकेकडून सहावे षटक टाकण्यासाठी क्वेना मफाका गोलंदाजीला आला. या षटकातील शेवटचा चेंडू ब्रायन बेनेटच्या हेल्मेटला जाऊन लागला. चेंडू लागताच तो मैदानावरच बसला. फिजिओ मैदानात आले, त्याची तपासणी केली. त्यानंतर त्याने तीन चेंडू खेळून काढले.

आठव्या षटकात त्याने मैदान सोडण्याचा निर्णय घेतला आणि रिटायर्ड हर्ट झाला. काही मिनिटांनी झिम्बाब्वे क्रिकेटकडून ब्रायन बेनेट काँकशनमुळे बाहेर होत असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. त्याच्या जागी प्रिन्स मसवउरेला संधी देण्यात आली आहे.

आयसीसीच्या नव्या नियमानुसार ब्रायन बेनेट पुढील सात दिवस मैदानावर पुनरागमन करू शकणार नाही. आयसीसीने आधीच स्पष्ट केले आहे की, जर एखादा खेळाडू काँकशनमुळे बाहेर होत असेल आणि त्याच्या जागी बदली खेळाडूची घोषणा करण्यात आली असेल, तर काँकशनमुळे बाहेर झालेला खेळाडू सात दिवस मैदानावर पुनरागमन करू शकणार नाही.

## राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांची विजयी सलामी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या दोन्ही संघानी पहिल्या १८वर्षाखालील मुले व मुलींच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. उत्तर प्रदेशमधील हरिद्वार येथे ही स्पर्धा खेळली जात आहे.

मुलींच्या इ गटात महाराष्ट्राने झारखंडवर ५०-१६ अशी सहज मात करीत साखळीत पहिल्या विजयाची नोंद केली. आक्रमक सुरुवात करीत महाराष्ट्राने पूर्वार्धात ३५-१० अशी भक्कम आघाडी घेत आपला विजय निश्चित केला. उत्तरार्धात त्याच जोशात खेळ करीत गुणांचे अर्धशतक गाठले. बिदिशा सोनार, सेरेना म्हसकर यांचा चढायांचा झंझावात थोपविणे झारखंडला जमले नाही. प्रतीक्षा गुरव हिचा बचाव उत्कृष्ट होता. यांच्या खेळामुळे महाराष्ट्राला हा विजय सोपा गेला.

मुलांच्या सामन्यात महाराष्ट्राने इ गटात केरळचा ५४-२४ असा दारुण पराभव केला. बचाव व आक्रमणावर समांतर भर देत मुलांनी विश्रांतीलाच २१-०८ अशी आघाडी घेतली होती. नंतरदेखील आपला खेळात सातत्य राखत गुणांचे अर्धशतक पार करीत सामना एकतर्फी केला. स्वराज मुळे, अथर्व सोनवणे यांच्या तुफानी चढाया त्यांना जीवन जाधव, प्रसाद दिघोळे यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हा विजय सहज शक्य झाला. केरळच्या संघाला उत्तरार्धात थोडा फार सूर सापडला, पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती.

























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com